कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १२ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## खंडाळा घाटात मालगाडी घसरली

**नेरळ :** मध्य रेल्वेचे मुंबई-पुणे मेन लाईन वरील खंडाळा घाटात मालवाहू गाडी रुळावरून घसरली. या गाड्यांमुळे डाऊन मार्गावरील दोन एक्स्प्रेस गाड्या थांबवून ठेवण्यात आल्याने त्यांचा खोळंबा झाला होता. सायंकाळी डाऊन मार्गावरील वाहतूक पुन्हा सुस्थितीत झाली आणि त्यानंतर त्या मेल एक्स्प्रेस गाड्या पुन्हा मार्गस्थ झाल्या.

मध्य रेल्वे पुणे-मुंबई मार्गावर मंकी हिल ते कर्जत या भागात खंडाळा घाटात सकाळी डाऊन मार्गावर मालगाडी रुळावरून खाली घसरली. या मालगाडीचे काही पान २ वर

## उद्या मुरूडमध्ये नियुक्ती पत्र वाटप

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्षाच्या मुरूड तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात येणार आहे. रविवारी (दि.१३) सकाळी दहा वाजता हा कार्यक्रम मुरूडमधील उसरोली टेप येथील आगरी समाज हॉलमध्ये होणार आहे. शेकापच्या राज्य सोशल मीडिया सेलच्या प्रमुख तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील तसेच शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी यांनी दिली.

### वेधक

## मंत्री शिरसाटांचा पाय खोलात

**मुंबई :** आधी आयकर विभागाची नोटीस आणि आता पैशांच्या बॅगेचा व्हिडीओ... एकनाथ शिंदेंचे शिलेदार आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट अडचणीत सापडले आहेत. शिरसाटांच्या घरातल्या बेडरूममधला एक व्हिडीओ समोर आला. या व्हिडीओत दोन बॅगा दिसत आहेत. त्यापैकी एका बॅगेत नोटांची बंडलं असल्याचा दावा ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊतांनी केला. हा व्हिडीओ राऊतांनी आपल्या ट्विटर हँडलवरूनही ट्विट केला. हा व्हिडीओ आपल्याच बेडरूममधला असल्याचं संजय शिरसाटांनी मान्य केलं. पण, पैशांची बॅग आपली असल्याचा आरोप त्यांनी फेटाळला. प्रवास करून आल्यानंतरची ती कपड्यांची बॅग असल्याचं शिरसाटांनी सांगितले.

## आ. गायकवाडांवर गुन्हा दाखल

**मुंबई :** मंत्रालयाजवळील आकाशवाणी आमदार निवासातील कँटीनमध्ये निकृष्ट अन्न दिल्याची तक्रार करत आमदार संजय गायकवाड यांनी कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. आमदार गायकवाड यांनी बनियन आणि टॉवेलवर कँटीनमध्ये येऊन संतप्त होत कर्मचाऱ्याला फिल्मी स्टाईलने बेदम मारहाण केली होती. या मारहाणीचे पडसाद विधिमंडळातही उमटले. त्यानंतर मारहाण करणाऱ्या संजय गायकवाड यांच्यावर कारवाईची मागणी होत होती. अखेर शुक्रवारी मारहाण करणारे आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## परभणी हादरलं

**परभणी :** फीसाठी संस्थाचालकाची मुजोरी थेट पालकाच्या जीवावर उठली आहे. संस्थाचालकाने केलेल्या मारहाणीत पालकाचा जीव गेला आहे. याप्रकरणी संस्थाचालकावर परभणीच्या पूर्णा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परभणीच्या उखळद गावातील पल्लवी जगन्नाथ हेंडगे या विद्यार्थिनीचा प्रवेश अवघ्या काही दिवसांपूर्वी पूर्णा तालुक्यातील हट्टा येथे असलेल्या हायटेक निवासी शाळेत तिचे वडील जगन्नाथ हेंडगे यांनी तिसरीत केला होता. मात्र, तिथे काही दिवस राहिल्यानंतर मला इथे नको म्हणत गावातील शाळेतच टाका, असा तगादा तीन वर्षीय मुलीने पालकांकडे लावला होता. त्यावरून तिचे वडील जगन्नाथ हेंडगे हे आपल्या मुलीची टीसी काढण्यासाठी शाळेत गेले होते.

**मुरूड पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाची कारवाई**

# चरस तस्करी रॅकटचा पर्दाफाश



**13 जणांविरोधात गुन्हा दाखल**

**साडेतेरा लाखांचा साठा जप्त**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

मुरूड व काशीद येथील पर्यटनस्थळी अवैधरित्या चरस विक्रीचा अवैध धंदा चालविणाऱ्या रॅकटचा पर्दाफाश करण्यात आला. मुरूड पोलिसांसह रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने ही कारवाई केली. १३ लाख ६१ हजार रुपये किमतीचा चरसचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी १३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये मुरूडमधील आयक्रीम विक्रेता आणि घोडेवाल्याचा समावेश आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला नेपाळमधून अटक करण्यात आले आहे. मुरूड, काशीदमधील चरस विक्री, वाहतुकीचे कनेक्शन नेपाळशी असल्याचे उघड झाले आहे. पान २ वर

### नेपाळ, मध्य प्रदेशमध्ये धागेदोरे

रायगड जिल्ह्यातील मुरूड व काशीद हे पर्यटनस्थळ आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक तसेच स्थानिक पर्यटक येतात. या पर्यटकांसह काही स्थानिकांना चरस विकण्याचा प्रकार चालविला जात होता. त्या परिसरातील घोडेवाले आणि आयस्क्रीम विक्रेत्यांच्या मदतीने चरसची विक्री, वाहतूक व वितरण सुरु होते. या गुन्ह्यातील विशाल जैसवाल हा आरोपी मुख्य वितरक असून, नेपाळ आणि मध्य प्रदेशमधून चरस आणून ते या परिसरात विकत होता. आशिष डगे व प्रणित शिगवण या स्थानिकाच्या मदतीने चरस विकला जात होता.

### वर्षभरापासून करत होता तस्करी

विशाल जैसवाल हा आरोपी गेल्या २०२४ पासून चरस तस्करीचा व्यवसाय करीत होता. नेपाळ येथून तो चरस आणून मुरूड तालुक्यात विकत होता. अनुप जैसवालच्या माध्यमातून ठिकठिकाणी चरसची विक्री केली जात होती. विशाल नेपाळला पळून गेला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक गेले अनेक दिवस मध्य प्रदेशमध्ये होते. अखेर नेपाळ पोलिसांसह स्थानिक पोलिसांच्या मदतीने विशालला नेपाळ येथून अटक करण्यात आली आहे.



### पोलीस अधीक्षकांचे युवकांना आवाहन

जिल्ह्यात चरस, गांजा आदी अंमली पदार्थ विक्री, वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे धाडसत्र सुरू केले आहे. वाहतूक विक्री कणाऱ्यांना मदत करणाऱ्यांनादेखील गुन्ह्यात आरोपी केले जाणार आहे. युवकांनी अंमली पदार्थाच्या आहारी न जाता, सतर्क राहणे गरजेचे आहे. असा अनुचित प्रकार उघड झाल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले आहे.

# सागरी सुरक्षा धोक्यात

- **जिल्ह्यात हजारो बोटी बेकायदेशीर**
- **संशयित 'बोया' प्रकरणात रायगड पोलिसांचा खुलासा**

सुयोग आंग्रे
रायगड

मुरुड-कोरलई समुद्रात आढळलेली संशयास्पद बोट प्रत्यक्षात बोट नसून 'बोया' असल्याचे एएसआय ट्रान्सपोंडरद्वारे स्पष्ट झाले आहे. मात्र, या प्रकरणाचा तपास करत असताना अधिक धक्कादायक माहिती समोर आली आहे. रायगड जिल्ह्यातील एक हजारांहून अधिक बोटी बेकायदेशीर असून, त्यांची नोंदणी झालेली नसल्याचे उघडकीस आले आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी दिली.

दि. ६ जुलैच्या रात्री कोर्लई किल्ल्याजवळ एक संशयास्पद बोट Muqadar Boya 99 (MMSI: 463800411) दिसून आली होती. ही बोट पाकिस्तानातून आलेली असण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर तटरक्षक दल, नौदल आणि दिल्लीमधील संबंधित यंत्रणांकडून मिळालेल्या पान २ वर

> "सागरी आणि मच्छिमारांच्या सुरक्षेसाठी बोटींची नोंदणी अत्यावश्यक आहे. एखादी दुर्घटना घडल्यास मदत पोहोचवण्यासाठी आणि तपास सुलभ होण्यासाठी नोंदणी अनिवार्य आहे."
> – आंचल दलाल, जिल्हा पोलीस अधीक्षक

> "रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टी भागात मासेमारी करणाऱ्या ५ हजार ४१७ बोटींची नोंदणी मत्स्यव्यवसाय विभागाच्या दप्तरी आहे. मासेमारी बोटींचा परवाना नूतनीकरण ही एक प्रक्रिया आहे. यामुळे बोटींची नोंदणीची संख्या कमी-अधिक होऊ शकते. पावसाळ्याच्या दिवसात मासेमारी बंदी असल्याने बोटी किनाऱ्यावर नांगरल्या जातात. यामुळे नूतनीकरण बोटी सुरु करण्याच्या अगोदर करण्यात येते. रायगड जिल्हा पोलिसांकडून अद्यापपर्यंत अनधिकृत मासेमारी बोटी आढळ्याबाबत मत्स्यव्यवसाय विभागाकडे संपर्क साधलेला नाही. त्यांच्याकडून अनधिकृत बोटींबाबत कळविल्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल."
> – संजय पाटील, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, रायगड

## अखेर गेल प्रशासन नमले

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

गेल कंपनीमध्ये नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये स्थानिकांसह प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळावी, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्यावतीने पंधरा दिवसांपासून कामबंद आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाला स्थानिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अखेर प्रकल्पग्रस्त, स्थानिकांच्या आंदोलनासमोर कंपनी प्रशासन नमले. शुक्रवारी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांच्यामध्यस्थीने प्रकल्पग्रस्तांच्या अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी बेमुदत संप मागे घेतला.

गुरुवारपासून (दि.२६ जून) गेल कंपनी प्रशासनाविरोधात निलेश गायकर पान २ वर

## मुख्याध्यापिकेला निष्काळजीपणा भोवला

- **आयुक्तांकडून तात्काळ निलंबन**
- **विद्यार्थ्यांकडून जेवणाचे ताट/डब्बे घ्यायची धुवून**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत असलेल्या श्री गणेश विद्या मंदिर शाळा क्र.६ मध्ये विद्यार्थ्यांना जेवणाचे ताट धुवावयास लावणे ही बाब अत्यंत गंभीर व चुकीची असल्याने याची तातडीने दखल घेऊन पनवेल महानगरपालिका आयुक्तांनी शाळेच्या मुख्याध्यापिका यांना तात्काळ निलंबित केले असून, शिक्षण अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत असलेल्या या शाळेमध्ये सदरील कामे करण्यासाठी अक्षयपात्र या संस्थेची निवड शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात आलेली आहे. सदरील कामे करणाऱ्या आया यांनाही बदलावे, असे स्पष्ट आदेश संबंधित संस्थेला याप्रकरणी देण्यात आलेले आहेत. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन सुदाम हिलम यांना याप्रकरणी निष्काळजीपणा केल्यामुळे तात्काळ निलंबित करण्यात आले, तर पनवेल महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत असलेल्या सर्व शाळांमध्ये अशा प्रकारच्या बाबींसंदर्भात कसल्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा चालणार नाही. सर्व संबंधितांनी अत्यंत जागरूकतेने लहान मुलांच्या बाबतीत सतर्क असावे, अशा ही सूचना सर्व शाळांना देण्यात आल्या आहेत.

## इसांबेवाडीत अतिसाराची साथ

- **तीन वर्षांच्या मुलाचा मृत्यू**
- **दहा जणांवर उपचार सुरू**



**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी पाताळगंगा परिसरातील इसांबेवाडीत अतिसाराच्या साथीने सोहम तुकाराम वाघमारे या तीन वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला असून, लागण झालेले जवळपास दहा जण वेगवेगळ्या रुग्णालयांत उपचार घेत आहेत. सावरोली खारपाडा मार्गावर २८८ लोकसंख्येची इसांबेवाडी आहे. या वाडीतील सोहमला उलट्या, जुलाब सुरू झाले होते. यावेळी मुलाचे कुटुंब आसरेवाडी येथे वस्तीला गेले होते. तेथून रुग्णालयात जाण्यापूर्वीच सोहमचा मृत्यू झाला. सोहमच्या मृत्यूनंतर अतिसराचे सहा रुग्ण लोहप प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल झाले. यामध्ये चार महिला व दोन पुरुषांचा समावेश आहे.

अतिसाराची साथ असल्याचे लक्षात आल्यानंतर सतर्क झालेल्या आरोग्य यंत्रणेने इसांबे आदिवासीवाडीत घरोघरी तपासणी मोहीम सुरू केली आहे. अतिसाराचे लागण झालेले दोन रुग्ण भिवपुरी येथील रुग्णालयात, तर दोन रुग्ण पेण येथील रुग्णालयात असल्याची माहिती मिळाली आहे. पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीकरिता पाठवण्यात आले असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

## आंबेनळी घाटरस्त्यावर दरड कोसळली

**भोर-आंबेनळी घाटबंदीमुळे पश्चिम महाराष्ट्राशी संपर्क लांबला**

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरून पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यानच्या आंबेनळी घाटात गुरूवारी पोलादपूर तालुक्यातील पायटा येथे दरडी कोसळली. यामुळे भोरपाठोपाठ आंबेनळी घाटबंदीमुळे पश्चिम महाराष्ट्राशी संपर्क लांबला असून, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आंबेनळी घाट वाहतूकबंदीची अधिसूचना जारी केली आहे.

पोलादपूर महाबळेश्वर रस्त्याच्या सुधारणेचे काम कंत्राटदार आरपीपी-एसआयपीएल (४) यांच्यामार्फत हाती घेण्यात आले असून, सद्यःस्थितीत काम प्रगतीपथावर आहे. हा रस्ता पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातून जात असून, पायटा गावापासून महाबळेश्वरकडे जाताना १ कि.मी. अंतरावर दरडप्रवण क्षेत्रात गुरूवारी जोराचा पाऊस पडल्यामुळे डोंगरावरील दगड गोठे व माती रस्त्यावर आली.



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

याठिकाणचे माती व दगड गोटे जेसीबीच्या सहाय्याने काढण्याचे काम कंत्राटदारांमार्फत प्राधान्याने चालू आहे. या दरडप्रवण क्षेत्रामध्ये अजून माती व दगड येण्याची शक्यता असून, ते काढण्यास चार ते पाच दिवस लागणार असल्याने पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी महाबळेश्वर तहसीलदार सचिन मस्के यांना दूरध्वनीद्वारे वाहतुकीसाठी महाबळेश्वर ते पोलादपूर रस्ता बंद ठेवण्याची सूचना केली.

यादरम्यान गुरुवारी दुपारनंतर पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे आणि तहसीलदार घोरपडे यांनी कर्मचाऱ्यांसमवेत दरडप्रवण क्षेत्रामध्ये वाहतूक सुरळीत राहण्यासाठी वाहनचालकांना मार्गदर्शन केले. पोलादपूर तहसीलदार घोरपडे यांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाला पावसाळ्याच्या कालावधीत अवजड वाहनांकरिता पान २ वर

**नैराश्यातून विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या | पोटचा मुलगा गेल्याने आईवडिलांना धक्का**

# गरिबी ठरली शिक्षणात अडसर

**| रसायनी | प्रतिनिधी |**

**शिक्षण घेऊन मोठे होण्याच्या महत्त्वाकांक्षेत आर्थिक अडचणी आड आल्या आणि त्यावर मात करणे शक्य झाले नाही. त्यातून नैराश्याने ग्रासले आणि १७ वर्षीय विद्यार्थ्याने घरामध्ये छताला गळफास लावून घेत आत्महत्या केली. जीवनात यशस्वी होण्यासाठी अपयशाने खचून न जाता सातत्यपूर्ण प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. मात्र, अभ्यासात हुशार असूनही गळफास घेऊन केलेली आत्महत्या खूपच जिव्हारी लागली आहे.**

प्रतिक जनार्दन खंडागळे (१७, रा. भटवाडी, रिस) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, तो इयत्ता अकरावीमध्ये शिकत होता. तो शिक्षणात हुशार असल्याची माहिती अनेकांनी दिली. घरची गरिबी व पुढील शिक्षणास पैसे नसल्यामुळे, सततच्या आईच्या आजारपणामुळे व वडिलांना कामधंदा नसल्यामुळे नैराश्यातून प्रतिकने आपल्या घरात छताच्या लोखंडी रॉडला साडी बांधून गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. त्याच्या या आत्महत्येमुळे रसायनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा शिवाजी पानपट्टे अधिक तपास करीत आहेत.



### आई-वडिलांनी फोडला हंबरडा

**एकीकडे चांगले शिक्षण घेऊन अधिकारी बनायचं स्वप्न उराशी बाळगून जीव तोडून अभ्यास करायचा. दुसरीकडे मात्र शिक्षणात गरिबी आड येत असल्यामुळे प्रतिकला नैराश्याने ग्रासले होते. या नैराश्यातूनच त्याने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली. पोटच्या गोळ्याला निपचित पडलेला पाहून आई-वडिलांना हंबरडा फोडला. पहाडाएवढे दुःख त्यांना पचवणे अवघड गेले.**

प्रतिक हा अभ्यासात हुशार, प्रामाणिक व मेहनती मुलगा होता. घरच्या गरिबीमुळे तो कायम नैराश्यात असायचा. आपल्या कुटुंबाची गरिबी कधी संपणार? असा प्रश्न तो घरच्या मंडळींकडे कायम उपस्थित करायचा. याच नैराश्यातून त्याने गळफास घेत आत्महत्या केली. प्रतिकच्या आईवडिलांसाठी हा मोठा धक्का होता. आपला मुलगा शिकून मोठा व्हावा, चांगल्या अधिकारी पदावर नोकरी करावी, अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी ते अपार मेहनत घेत होते.

प्रतिक अभ्यासात हुशार असल्याने त्याच्याकडून त्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, ध्यानीमनी नसतानाही नैराश्येतून प्रतिकने आत्महत्या करुन आपली जीवनयात्रा संपविली. आईवडिलांच्या अपेक्षा अधांतरी ठेवत आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने आई-वडिलांच्या पायाखालची वाळू सरकली असून, त्यांना मोठा धक्का बसला आहे. प्रतिकवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## महामार्ग खड्डेमुक्त करा | जिल्हाधिकारी जावळेंचे निर्देश

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

महामार्गाचे काम हा जिल्हा प्रशासनाचा प्राधान्याचा विषय आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून सुरु असून, अपूर्ण काम व कामाच्या अनियमिततेमुळे महामार्गावर होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत आहे. मुंबई-गोवा महामार्गावर अपूर्ण असलेल्या कामांमुळे आणि खड्डेमुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. या महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळून नागरिकांचा प्रवास सुरक्षित होण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गावरील बायपास, सर्व्हीस रोड यांचे मजबुतीकरण करून गणेशोत्सवापूर्वी हा महामार्ग खड्डेमुक्त करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाच्या सद्य:स्थितीबाबत तसेच महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबतची आढावा जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीकांत गायकवाड, वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरुन लाखो चाकरमनी कोकणात जातात. या काळात त्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी पुलांची बांधकामे सुरु आहेत, त्याठिकाणी वाहतूक गतिमान होईल यासाठी खड्डे तात्काळ बुजवावे. संपूर्ण महामार्गावर दिशादर्शक फलक, बाण ठळकपणे लावावे. आवश्यकतेप्रमाणे ठिकठिकाणी रिफ्लेक्टर लावावेत, गरज असलेल्या पुलावर सुरक्षेसाठी सुरक्षा जाळ्या लावाव्यात. रायगड जिल्ह्यातील पर्यायी मार्गाचे आवश्यकतेप्रमाणे तात्काळ डागडुजी, दुरुस्ती करण्यात याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या. महामार्गाच्या कामामध्ये प्रस्तावित असलेल्या सर्व सर्व्हिस रोड, भुयारी मार्ग, साईडपट्ट्या यांचे काम प्राधान्याने पूर्ण करावे. सर्व संबंधित यंत्रनेने काम पूर्ण झाले की नाही याची खातरजमा करावी. पान २ वर

# शिवसेनेसोबत युतीची आम्हाला हौस नाही



(छायाचित्र : संजय गायकवाड)

## सुधाकर घारे यांचे प्रतिपादन

। कर्जत । प्रतिनिधी ।

विधानसभा निवडणुकीत माझा झालेला पराभव मी मान्य केला आहे. मात्र, आमदार थोरवे यांना विजयाचा आनंद घेता येत नाही. थोरवे म्हणतात कदापिही राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर युती केली जाणार नाही. मग मी म्हणतो, आम्हाला तरी कुठे कर्जतमध्ये शिवसेनेबरोबर युती करायची हौस आहे? आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वरिष्ठ नेत्यांचा आदेश मानला जाईल. कोणत्याही बाबतीत ते खोटे बोलतात. माझ्यावर व भरत भगत यांच्यावर खोट्या तक्रारी कर्जत पोलीस ठाण्यामध्ये संतोष भोईर यांच्या नावाने केल्या होत्या. मात्र, संतोष भोईर यांनी मी अशा प्रकारच्या तक्रारी कधीही केल्या नाहीत, असे पोलीस ठाण्यामध्ये येऊन सांगितले. म्हणजे, संतोष भोईर यांच्या नावाने कुणी खोट्या तक्रारी केल्या, ते बघा, असे स्पष्ट प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे कर्जत विधानसभा अध्यक्ष सुधाकर घारे यांनी येथे केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची कर्जत तालुका पदाधिकारी आढावा बैठकीचे आयोजन रॉयल गार्डनच्या सभागृहात आयोजन करण्यात आली होती. याप्रसंगी सुधाकर घारे, माजी सभापती नारायण डामसे, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, एकनाथ धुळे, तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, अजय सावंत, मनोहर पाटील, अशोक सावंत, जयवंती हिंदोळा, सुरेखा खेडकर, ॲड. रंजना धुळे, ॲड. स्वप्नील पालकर, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, भारती पालकर, मधुरा चंदन, सुवर्णा निलधे, सुनील गायकवाड, कुमार दिसले, संदीप करणूक, जयेंद्र देशमुख आदी उपस्थित होते. याप्रसंगी नव नियुक्त पदाधिकाऱ्यांचा तसेच पक्ष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

घारे यांनी, सुरेश टोकरे आणि भगवान चंचे यांना जेलमध्ये अडकवण्याचे काम कुणी केले? आणि त्यांना सोडवण्याचे काम कुणी केले? हे त्या दोघांनाच जाऊन विचारा. कुणाला तरी नेरळमध्ये जिल्हा परिषद निवडणूक लढवायची म्हणून हे केले असल्याचे वाटते. निवडणुकीत पराभव झाला म्हणून मला घरी बसवले, असे बोलतात. पण, राष्ट्रवादी काँग्रेसमधील एक साधा कार्यकर्तासुद्धा पक्ष सोडून गेला नाही. उलट, तुमच्या पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सातत्याने प्रवेश करतात. थोरवेंनी आपली प्रायव्हेट लिमिटेड कंपनी बंद करावी, असा सल्ला थोरवे यांना दिला. याप्रसंगी नवीन नियुक्त्या केलेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. सूत्रसंचालन ॲड. योगेश देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. स्वप्नील पालकर यांनी केले.

याप्रसंगी सुनील घोडविंदे, प्रमोद राईलकर, मधुकर घारे, बळीराम देशमुख, शरद हजारे, हरेश घुडे, रवींद्र घारे, केतन बेलोसे, मंगल ऐनकर, दत्ता सुपे, सोमनाथ पालकर, अतुल कडू, प्रमोद देशमुख, अविनाश कडू, भरत भासे, महेंद्र घारे, प्रमोद पिंगळे, अजय पवार आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## चरस तस्करी रॅकटचा पर्दाफाश

रायगड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली नाकाबंदी चालू होती. ठिकठिकाणी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात होती. रायगड पोलीस दलातील मुरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिघ्रे येथे तपासणी नाक्यावर पोलीस हवालदार हरी मेंगाळ नाकाबंदीला होते. २९ जूनला मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास गस्तीवर असताना समोरून एक स्कूटर आलेली दिसली. चालकाच्या वाहन चालविण्यावरून पोलिसांना संशय आला. त्याचवेळी दुचाकी चालकाच्या मागे बसणारा एकजण चालत्या दुचाकीवरून उडी मारून तेथून पसार झाला. या प्रकारामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. पोलिसांनी दुचाकी थांबवून चालकाची चौकशी केली. त्याच्या बोलण्यामध्ये गडबड गोंधळ निर्माण झाल्याचे दिसून आले. त्यामुळे गाडीची तपासणी केली. त्यावेळी गाडीमध्ये ७७६ ग्रॅम वजनाचा चरस नावाचा अंमली पदार्थाचा साठ सापडला. याप्रकरणी मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, पोलीस हवालदार जनार्दन गदमले, हरि मेंगाळ, पोलीस नाईक किशोर बठारे, पोलीस शिपाई अतुल बारवे, विशाल पाटील यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पथक तयार करण्यात आले. दुचाकी चालक अलवान दफेदार याला ताब्यात घेऊन त्याची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. चरस वितरण करण्यापासून वाहतूक करणे, वितरण करण्यासाठी देखरेखीवर असणारे अशा अनेक जणांची माहिती घेऊन त्यांना पकडण्यास सुरूवात केली. गेल्या १२ दिवसांमध्ये १३ जणांना अटक करण्यास या पथकाला यश आले असून, त्यांच्याकडून दोन किलो ६५९ ग्रॅम वजनाचे १३ लाख ६१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या गुन्ह्यात अलवान दफेदार, विशाल जैसवाल, अनुप जैसवाल, अनुज जैसवाल, आशिष डिगे, प्रणित शिगवण, आनस कबले, वेदांत पाटील, साहिल, नाडकर, अनिल पाटील, सुनील शेलार, राजू खोपटकर, खुबी भगेल या आरोपींचा समावेश आहे. १८ पासून २७ वर्षांपर्यंतचे नऊ आरोपी आहेत. काशीद, मजगाव, पेठ मोहल्ला, गावदेवी पाखाडी, मुरूड, कल्याण, उत्तर प्रदेश येथील हे आरोपी आहेत. त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चोरीच्या गाडीतून चरसची वाहतूक**

स्कूटरमधून चरसची वाहतूक करण्यात आली होती. ती स्कूटर पोलिसांनी जप्त केली. स्कूटरची माहिती घेतल्यावर ती स्कूटर चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. आणखी काही दुचाकी चोरीला गेल्याचे या तपासात उघड होण्याची शक्यता असल्याचे पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी व्यक्त केली आहे.

## खंडाळा घाटात मालगाडी घसरली

डबे रुळावरून खाली उतरल्याने त्या ठिकाणी मध्य रेल्वेचे मार्गावरील वाहतूक बंद पडली. मंकी हिल केबिनजवळ त्या मालगाडीचे डबे रुळावरून खाली उतरल्याने या भागातील वाहतूक थांबवण्यात आली. त्याचा परिणाम डाऊन मार्गावर असलेल्या गाड्या आहे त्याच ठिकाणी थांबवण्यात आल्या होत्या. कर्जतकडून पुण्याच्या दिशेने निघालेल्या मालगाडीचे काही डबे रुळावरून घसरल्याने मुंबई-बंगळुरू कोणार्क एक्स्प्रेस वांगणी स्थानकात थांबवण्यात आली. तर, जोधपूर हडपसर एक्स्प्रेस ही गाडी कर्जत स्थानकात थांबवून ठेवण्यात आली होती. दुपारनंतर मालगाडीचे रूळावरून घसरलेले डबे पुन्हा सुस्थितीत आणण्यात आल्यानंतर मालगाडी पुण्याकडे रवाना झाली.

## हजारो बोटी बेकायदेशीर

माहितीनुसार स्थानिक पोलीस सतर्क झाले. बोटीमध्ये कोणीही आढळले नव्हते, मात्र तिच्या उपस्थितीमुळे सखोल तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान स्पष्ट झाले की, ती वस्तू प्रत्यक्षात एक बोया आहे. मात्र, अद्याप त्या बोयाचा ठावठिकाणा लागलेला नाही. त्यामुळे रायगड पोलीस आणि इतर शासकीय यंत्रणांकडून सर्च आणि कोंबिंग ऑपरेशन राबवले जात आहे. याच तपासात एक हजारांहून अधिक बोटी बेकायदेशीर असून, त्यांची नोंदणी नसल्याचे निष्पन्न झाले. याबाबतची माहिती मत्स्यव्यवसाय आयुक्त आणि सहआयुक्तांना कारवाईसाठी देण्यात आली आहे.

## अखेर गेल प्रशासन नमले

यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांनी लढा सुरू होता. कंपनीसमोर एकत्र येऊन प्रकल्पग्रस्त, स्थानिक आणि महिलांनी काम बंद आंदोलन केले. आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आंदोलन मोडीत काढण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात आली. परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. परंतु प्रकल्पग्रस्त, स्थानिक त्यांच्या भूमिकेशी ठाम होते. पोलिसांच्या मदतीने बाहेरील राज्यातील कामगार कंपनीत काम करीत होते. परंतु, स्थानिकांकडून मदत मिळत नसल्याने कंपनीच्या कामावर परिणाम झाला. अखेर गेल कंपनी प्रशासन प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनासमोर नमले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अलिबागमध्ये बैठक घेण्यात आली. प्रकल्पग्रस्त, स्थानिक, गेल कंपनी प्रशासन व पुनर्वसन विभागाचे अधिकारी या बैठकीत उपस्थित होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांच्या मध्यस्थीने प्रकल्पग्रस्तांच्या अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या. कंत्राटी स्वरूपात २६४ कामगारांना दहा दिवसांत कामावर घेतले जाईल. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वारसांना देणे, कंपनीत अग्रक्रमाने प्रकल्पग्रस्त, गावातील त्यानंतर दुसऱ्या गावांतील उमेदवारांना कंपनीत कामावर घेणे, प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी नियुक्ती देणे, सीएआर निधी प्रकल्पबाधित गावांतील ग्रामपंचायतींना ७० टक्के वाटप करणे, अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. या चर्चेत जिल्हा प्रशासनाच्या मध्यस्थीने मागण्यांना मान्यता देण्यात आली.

## आंबेनळी घाटरस्त्यावर दरड कोसळली

मनाई करणे, तसेच हलक्या वाहनांना रेड अलर्ट परिस्थितीमध्ये व शनिवारी व रविवारी वीक एन्डला प्रवेश बंदी करणे आवश्यक असून, घाटरस्त्यावर पर्यटक गर्दी करीत असल्याने अपघात टाळण्याकरिता पर्यटक वाहनांना आंबेनळी घाटरस्त्यावर मनाई करण्यासाठी पोलादपूर महाबळेश्वर मार्ग सर्व वाहनांस चार दिवस वाहतुकीसाठी पूर्ण बंद होण्यासंदर्भात आदेश निर्गमित करण्याची विनंती केली.रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयानेही रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाला पोलादपूर महाबळेश्वर या आंबेनळी घाटरस्त्यावर डोंगरावरुन आलेले दगड, गोटे व माती काढण्याच्या कामाकरिता चार दिवस लागणार असल्याने दि. १० ते दि. १४ जुलैपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी आदेश काढण्यासाठी तसेच या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गावरून होण्यासाठी प्रस्ताव दिला.त्यानुसार रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे महोदयांनी दि. १० जुलै ते दि. १४ जुलै २०२५ या कालावधीत पोलादपूर महाबळेश्वर हा आंबेनळी घाटरस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता बंद करण्यासह या कालावधीत पर्यायी मार्ग म्हणून पोलादपूर-माणगाव ताम्हाणी मार्गे-पुणे-सातारा व पोलादपूर-चिपळूण-पाटण-सातारा-कोल्हापुर अशी वाहतुक करण्याचे आदेश जारी केले आहेत.महाड तालुक्यातील वरंध-भोर घाटरस्ता वाहतुकीस बंद केल्यानंतर आता पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटरस्तादेखील वाहतुकीसाठी बंद झाला असून, कशेडी घाटातील जुन्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याला भेगा पडल्यामुळे भोगाव दत्तवाडी व कातळी बंगला येथील वाहतूकदेखील नवीन भुयारी मार्गावरील पर्यायी वाहतुकीनंतर दुर्लक्षित झाली आहे. यामुळे पोलादपूर तालुक्यातील प्रवासी जनतेला वाई, महाबळेश्वर, भोर, सातारा व पुणे या पश्चिम महाराष्ट्रातील ठिकाणांशी संपर्क घाटबंदीमुळे संपर्क दुरावला आहे.

## महामार्ग खड्डेमुक्त करा

तसेच गणेशोत्सवादरम्यान माणगाव, इंदापूर या शहरात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने आणि महामार्ग प्राधिकरण यांनी ट्राफिक वार्डन नेमण्यात यावेत, या ठिकाणची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी संबंधित यंत्रणानी विशेष काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सायगांव, ता.मुरूड, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती, त्या-त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**
**मौजे सायगांव, ता. मुरुड, जि. रायगड.**

| अनु. नं. | गट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) | मालकांचे नाव (७/१२ प्रमाणे) |
|---|---|---|---|---|
| १) | २९५/२ | ३-६८-०० पो.ख. ०-३८-०० एकूण ४-०६-०० | ३.५७ | अरशद अ.गफुर दुदुके निलुफर अरशद दुदुके |
| २) | २९५/३ | १-८१-०० पो.ख. ०-१९-०० एकूण २-००-०० | १.७६ | निलुफर अरशद दुदुके |
| ३) | २९५/४ | २-४८-०० पो.ख. ०-२६-०० एकूण २-७४-०० | २.४१ | अरशद अ.गफुर दुदुके |

सदर मिळकतीमध्ये जाण्या-येण्याकरीता शिघे ते सायगांव-महानोरे मुख्य रस्त्यापासून सुरु होवून गट नं. २८५, २८९, २९०, २९१, २९२, २९३ व २९६ या मिळकतींमधून जाणारा व सदर मिळकतीपर्यंत पोहोचणाऱ्या वहिवाटीच्या रस्त्याच्या निरंतर हक्कासह.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १२/७/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, बाह्मणआळी, अलिबाग,
रायगड, ४०२ २०१.

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/s. Godrej Properties Ltd., Office: Godarej One, 5th Floor, Pirojshanagar, Eastern Express Highway, Vikroli (E), Mumbai - 400 079. | ०१ बोर, ०३ करंज, ०१ बाभूळ, ०१ बारतोंडी ०१ फिकस व ०३ ताड अशी एकूण १० झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १७+१८+१९, सेक्टर- ०५ए नोड खारघर, ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ बोर, ०३ करंज, ०१ बाभूळ, ०१ बारतोंडी ०१ फिकस व ०३ ताड अशी एकूण १० झाडे नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | तेजल को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., भूखंड क्र. ८३. स्वामी नित्यानंद मार्ग ओझा हॉस्पिटल शेजारी पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भूखंड क्र. ८३, स्वामी नित्यानंद मार्ग ओझा हॉस्पिटल शेजारी पनवेल ता.पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ झाड हे नवीन पाण्याच्या टाकीस धोका असल्याने. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावेत. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त**
**(वृक्ष प्राधिकरण विभाग)**
**पनवेल महानगरपालिका**

PMC-PARK/374/2025-PTAD

### जाहीर नोटीस

दि.१२/०७/२०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-आंबिवली त. कोतलखलाटी, तालुका-कर्जत, जि.-रायगड**
**येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| कविता सुभाष गोगीया | ४ | २/ब | ०.४४.६० | ०.७५ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. १२/०७/२०२५

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड.उत्कर्षा सुरेश सोनावळे**
पत्ता श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला,
दिवाणी न्यायालया समोर, विठ्ठल नगर,
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९०७५९९५९२८

### स्थावर मिळकत जप्ती आदेश
**(महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७ (१०) प्रमाणे)**

वाचले,
१) लवाद दावा क्रमांक १०८/२०२४ दिनांक :-१६/०२/२०२४
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (१२)
(३) वसुली अधिकारी यांची मागणी नोटीस जा.क्र.रिकव्हरी/ १५६/२१७/२०२४, दिनांक २७/०२/२०२४

जा.क्र./एस.आर.ओ./६८/सन २०२५
वसुली अधिकारी यांचे कार्यालय,
कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग,
कमळ भवन, शिवजी चौक, पो.ता.अलिबाग, जि. रायगड
दिनांक:- ११/०७/२०२५

**जाहीर नोटीस**

ज्या अर्थी चेअरमन, कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी मिळविलेला लवाद वसुली दाखला क्रमांक १०८/२०२४ दिनांक १६/०२/२०२४ यात नमुद केलेप्रमाणे श्री. संदेश मारुती पाटील / सौ.वनिता संदेश पाटील मु.नगरपालिका शाळा नं.६ जवळ, समर्थनगर, रामवाडी, पो.ता.पेण, जि. रायगड यांनी कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतून कर्ज घेतले असून सदर कर्ज थकीत झाल्यामुळे त्यांची खालील वर्णनाची मालमत्ता दावा रक्कम रुपये २९,०१,४६५/- व्याज + सरचार्ज + व इतर खर्च रक्कम न भरल्यामूळे प्रतिवादी यांची खाली नमुद केलली मालमत्ता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ (१०) व (११) अन्वये आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी यांची मिळकत जप्त करण्यात आली असून या आदेशानुसार त्या मालमत्तेचे हस्तांतरण अगर विक्री अथवा त्यातील हितसंबंधाचे कोणतेही खाजगी हस्तांतर किंवा मालकी हक्कातील बदल अथवा त्या मालमत्तेवर निर्माण केलेला कोणताही बोजा निर्णीत अर्जदार धनकोविरुद्ध रद्द व निरर्थक होईल.

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाची तारीख | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुद्ध दिला आहे त्यांची नाव व गावाचे नाव | घर मिळकत नंबर | भू-धारण पद्धती भोगवटादार वर्ग | क्षेत्रफळ हे./आर. | रुपये पैसे आकार | शेरा इतर बोजे (नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| १०८/२०२४ १६/०२/२०२४ | श्री. संदेश मारूती पाटील मु. नगरपालिका शाळा नं.६ जवळ, समर्थनगर, रामवाडी, पो.ता.पेण, जि. रायगड. | गाव-पेण ग्रामिण, तालुका-पेण, जिल्हा-रायगड. भूमापन क्र. १८३/१ | भोगवटादार वर्ग १ | १४५ चौ.मी. | १.०६ | कमळ नागरी सहकारी पत. मर्या., अलिबाग यांचा रु.२०,००,०००/- चा बोजा |
| | | घर मिळकत नंबर | भू-धारण पद्धती भोगवटादार वर्ग | क्षेत्रफळ हे./आर. | वार्षिक घरपट्टी | |
| | | असेसमेंट घर मिळकत क्रमांक १७/१७९ | भोगवटादार वर्ग १ | १४० चौ.मी. | २२८२/- | |

येणे रक्कम, त्यावरील व्याज व कायदेशीर खर्च आदेशाचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आत भरणा न केल्यास वर नमूद केलेली मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल.

सही/-
**श्री. शेखर शंकर घरत**
वसुली अधिकारी
(९२८४१३१६७९)
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे लम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अलिबाग. अलिबाग-रायगड

मुंबई विद्यापीठ
# मुंबई विद्यापीठ
(नॅक तृतीय चक्र मूल्यांकनाद्वारे ३.६५ (सीजीपीए) सह अ++ श्रेणी, विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा)
**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई)**
(पूर्वीची दूर व मुक्त अध्ययन संस्था - आयडॉल)
डॉ. शंकर दयाळ शर्मा भवन, कलिना, सांताक्रूझ (पू.) मुंबई ४०००९८

**ऑनलाइन प्रवेशाची अधिसूचना २०२५-२६**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत खालील अभ्यासक्रम**

**बी.ए. (प्रथम वर्ष)**
• इतिहास • राज्यशास्त्र • समाजशास्त्र • अर्थशास्त्र • ग्रामीण विकास • मानसशास्त्र • भूगोल • मराठी • हिंदी • इंग्रजी

**बी.कॉम. (प्रथम वर्ष)**
• कॉमर्स • अकाउंटन्सी • बिजनेस मॅनेजमेंट • बी.कॉम. अकाउंटिंग व फायनान्स

**बी.एस्सी. (प्रथम वर्ष)**
• माहिती तंत्रज्ञान • संगणकशास्त्र

**एम.ए. (भाग १)**
• इतिहास • समाजशास्त्र • अर्थशास्त्र • राज्यशास्त्र • मराठी • हिंदी • इंग्रजी • शिक्षणशास्त्र • भूगोल • मानसशास्त्र • जनसंपर्क • संज्ञापन आणि पत्रकारिता

**एम.ए. (भाग १) समाजशास्त्र (ऑनलाईन पद्धतीने)**

**एम.कॉम. (भाग १)**
• एडवांस अकाउंटन्सी • बिजनेस मॅनेजमेंट

**एम.एस्सी. (भाग १)**
• गणित • माहिती तंत्रज्ञान • संगणकशास्त्र

**पी.जी. डिप्लोमा इन फायनांशियल मॅनेजमेंट (सत्र १ व २)**

वरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लिंक: https://mucdoeadm.samarth.edu.in/
प्रवेशाचे वेळापत्रक : १४ जून, २०२५ ते ३१ जुलै, २०२५

**एम.ए. (भाग २)**
• इतिहास • समाजशास्त्र • अर्थशास्त्र • राज्यशास्त्र • मराठी • हिंदी • इंग्रजी • भूगोल • मानसशास्त्र

**एम.कॉम. (भाग २)**
• एडवांस अकाउंटन्सी • बिजनेस मॅनेजमेंट

**एम.एस्सी. (भाग २)**
• गणित • माहिती तंत्रज्ञान • संगणकशास्त्र

प्रवेशाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील
वरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लिंक: https://mucdoeadm.samarth.edu.in/

द्वितीय व तृतीय वर्ष
बी.ए., बी.कॉम., बी.कॉम. (अकाउंटिंग ॲण्ड फायनांस)
बी.एस्सी. • माहिती तंत्रज्ञान • संगणक शास्त्र
एम.ए.(भाग-२) • संज्ञापन आणि पत्रकारिता • जनसंपर्क • शिक्षणशास्त्र
प्रवेशाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील
सीबीसीएस पॅटर्न अंतर्गत वरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लिंक: https://idoloa.digitaluniversity.ac/

**एमसीए आणि एमएमएस (प्रथम वर्ष)**
पहिल्या वर्षाचे प्रवेश त्यांच्या प्रवेश परीक्षेनंतर होतील.
एमएमएस आणि एमसीए प्रवेश परीक्षेच्या अर्जासाठी लिंक : https://forms.epravesh.com/MumbaiUniversity/

कार्यालय संकेतस्थळ : https://mu.ac.in/distance-open-learning
सीडीओईचे संपर्क क्रमांक आणि ईमेल : ८६५७५८४३११ व ८६५७५८४३०१/info@idol.mu.ac.in
स्कॅन करा
दिनांक : २३ जून, २०२५, पीआरओ/ सीडीओई /१/२०२५
(प्रा.) डॉ. शिवाजी सरगर, संचालक

## निवडक



### खांदाड शाळेत वह्या वाटप

**माणगाव** : माणगाव नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद खांदाड शाळेत वह्या वाटप डिडवानिया चॅरिटेबल ट्रस्ट व बेटर सोसायटी तर्फे वह्या वाटप कार्यक्रम गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल वनगूले, सदस्य गीतेश जाईलकर यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य महेश पोवार,मुख्याध्यापिका नंदिनी वाले, सहशिक्षिका मधुरा वेदपाठक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रोहा न्यायालयात वकिलांचा सन्मान

**नागोठणे** : वकिलीची कोणतीही पार्श्वभूमी नसल्याने माझ्या घरातील मी पहिलाच वकील, पहिलाच न्यायाधीश झालो. पहिल्यांदा कोर्टाची पायरी चढताना मनात एक वेगळी भीती होती. सीनियरने पहिल्याच दिवशी मुदतीचा अर्ज देऊन तारीख वाढवून घेण्याचे काम सांगितले आणि माझ्या कामाची सुरुवात झाली. कोर्टासमोर वागताना नेहमी विनयशीलतेने, आदबीने वागले पाहिजे. माझा आजपर्यंतचा अनुभव पाहता रोहा न्यायालयातील वकिलांचे वागणे चांगले असल्याचे जाणवले आहे. ज्युनिअर वकिलांनी सीनियर वकिलांचे कोर्टासमोर चाललेले काम ऐकले पाहिजे. कारण वकिली ही एक शाळा आहे आणि त्यामध्ये आपण सतत शिकत राहिले पाहिजे असे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन रोहा न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश एस. व्हि. खैरे यांनी गुरुपर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. रोहा वकील संघटनेच्या सहकार्याने व अधिवक्ता परिषद रोहा शाखा यांच्या वतीने रोहा न्यायालयातील वकील बार रुममध्ये न्यायालयीन कामकाजाच्या वेळेनंतर संपन्न झालेल्या रोहा न्यायालयातील ज्येष्ठ वकिलांचा सन्मान व ज्येष्ठ वकिलांचे वकिली क्षेत्रातील अनुभव कथन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी न्यायाधीश एस. व्हि. खैरे बोलत होते. या कार्यक्रमात ॲड. आर. बी. सावंत, ॲड. एस. एन. सानप, ॲड. एम. डी. पाटील, ॲड. एन. जी. देशमुख यांचा कार्यक्रमात तर काही कारणास्तव कार्यक्रमास उपस्थित न राहिलेले ॲड. हेमंत गांगल, ॲड. पी.एच.पाटकर, ॲड. व्हि. डी. मोरे, ॲड. पी. के. देशमुख यांचा त्यांच्या निवासस्थानी जाऊन रोहा अधिवक्ता परिषदेतर्फे अध्यक्ष धनंजय धारप व पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला.

### घरकाम करणाऱ्याने दागिने चोरले

**पनवेल :** घरात काम करणाऱ्या नोकराने ४२ लाख ६० हजारांचे दागिने चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दौलत परमार असे आरोपीचे नाव आहे. सीमा सिंग यांच्या घरात तिघेजण काम करतात. सायंकाळी घरी आले असता त्यांना चांदीचा तांब्या बाहेर दिसला. तांब्याबाहेर कसा आला हे पाहण्यासाठी कपाटाची चावी घेऊन पाहिली असता कपाटात ठेवलेले दागिने सापडून आले नाहीत. घरात काम करणाऱ्या नोकरांकडे विचारणा केली असता त्यांनी माहिती नसल्याचे सांगितले.

### रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा संपन्न

**पनवेल :** तळोजा परिसरातील सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी आईशा मदरसा तर्फे रुग्णवाहिका उपलब्ध जरून देण्यात आली आहे. या रुग्णवाहिकेचा सर्वसामान्य नागरिकांना लाभ होणार आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, तळोजा पोलीस ठाण्याचे वपोनि प्रवीण भगत तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पार्टी शरद पवार गटाचे पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष शहाबाज फारूक पटेल, आयोजक व ट्रस्टचे प्रमुख अफरोज शेख आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

**सुकेळी** : रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान याच अनुषंगाने नागोठणे जवळच असलेल्या शिहु येथिल सुप्रसिद्ध डॉ. पुरुषोत्तम भोईर व डॉ. प्रिया भोईर यांनी दरवर्षीप्रमाणेच यावर्षीही एक सामाजिक जबाबदारी व बांधिलकीची भावना म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग येथिल सरकारी रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहकार्याने होणारे हे शिबीर रविवार ( दि.१३) रोजी सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत शिहु येथिल डॉ.पुरुषोत्तम भोईर यांच्या निवासस्थानी होणार आहे. हे शिबिर सर्वांसाठी खुले असुन अधिकाधिक व्यक्तींनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होण्याचे आवाहन डॉ. पुरुषोत्तम भोईर व डॉ प्रिया भोईर यांच्यामार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी डॉ.पुरुषोत्तम भोईर मो. न. ९४२११६८१७७ व डॉ. प्रिया भोईर मो.नं. ७७६९९७६१२५ येथे संपर्क साधण्यात यावा.

---

**खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरण; न्यायासाठी आंदोलनाचा इशारा**

# १६ जुलैपासून पेणमध्ये ठिय्या

**| कर्जत | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील वरवणे येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत शिकणारी विद्यार्थिनी खुशबू ठाकरे हिचा २२ जानेवारी रोजी मृत्यू झाला होता. खुशबूला न्याय देण्यासाठी आणि दोषींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी पेणमध्ये १६ जुलै पासून तहसील कार्यालयाच्या बाहेर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. आदिवासी विद्यार्थिनी खुशबू ठाकरे मृत्ये प्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्याची प्रमुख मागणी आहे.



पेण तालुक्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत चालविल्या जात असलेल्या वरवणे येथील आदिवासी आश्रम शाळेत खुशबू ठाकरे या आदिवासी विद्यार्थिनीचा कुष्ठरोगावरील उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

या घटनेला सहा महिने उलटूनही खुशबू ठाकरे प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आला नाही. आरोग्य विभागाचा चौकशी अहवाल आणि केमिकल एनलाइस रिपोर्ट सार्वजनिक करणेबाबत तथा रिपोर्टची वाट न पाहता तत्काळ दोषींवर गुन्हा दाखल करणे. या आणि इतर मागण्यांसाठी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली १६/७/२०२५ पासून तहसिलदार पेण यांचे कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन केले जाणार आहे.

त्याबाबत पेण तहसीलदार तानाजी शेजाळ आणि खुशबू ठाकरे प्रकरणाचे तपास अधिकारी सहाय्याक पोलीस निरीक्षक नवरखेड यांना देण्यात आले आहे.यावेळी खुशबू ठाकरेचे वडील नामदेव ठाकरे, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, ग्राम संवर्धन समिती तांबडी सदस्य नरेश कडू, पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेचे सी.आर. म्हात्रे, राजीव गांधी पंचायत राज संघटनेच्या राष्ट्रीय महासचिव नंदा म्हात्रे, महिला फेडरेशनच्या मोहिनी गोरे, सत्यशोधक चळवळचे संदिप पाटील गागोदे, आचार्य विनोबा भावे जन्मस्थान प्रतिष्ठानच्या संगीता व वंदना जाधव आदी उपस्थित होते. खुशबूच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर लवकरात लवकर गुन्हे नोंद होऊन एका आदिवासी कन्येला न्याय देण्याच्या प्रक्रियेत आदिवासी समाजासह इतर समाजातील सर्व घटकांतील नागरिकांनी, राजकीय तथा सामाजिक संघटनांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

#### आंदोलनातील प्रमुख मागण्या

**खुशबू ठाकरे हिच्या मृत्यूची चौकशीचा अहवाल पोलिसांना सादर करून तो सार्वजनिक करावा. खुशबू ठाकरे हिचा केमिकल ऐनालाइस रिपोर्ट पोलिसांना देऊन सार्वजनिक करावा. दोन्ही अहवाल १६ जुलै २०२५ पूर्वी सादर न झाल्यास सदर अहवालाची वाट न पाहता खुशबूच्या पालकांच्या व सामाजिक संघटनांच्या तक्रारी निवेदनाच्या आधारावर दोषींवर गुन्हा दाखल करण्यात यावा व निवेदनात नमूद दोषींची चौकशी तपास करून पुरावे गोळा करून न्यायालयात चार्जशीट सादर करण्यात यावी.आरोग्य विभागाच्या चौकशी समितीने जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे यांचा कोणताही जबाब चौकशीत ग्राह्य धरू नये व अशा बेजबाबदार अधिकारांचा गैरवापर करणाऱ्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सदर पदावरून तत्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात यावा. खूशबू ठाकरे हिच्या पालकांना १० लाख नुकसानभरपाई देण्यात यावी. आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.**

---

## मुरुड-तेलवडे परिसरात विनापरवाना वृक्षतोड

**वनविभागाने केला खैर तस्करीचा पर्दाफाश**



**| कोर्लई | वार्ताहर |**

मुरूड तालक्यातील वनविभागाच्या क्षेत्रात येणाऱ्या तेलवडे गावाच्या जवळील खाजगी क्षेत्रात बेकायदेशीर सोलीव खैर लाकडाची तस्करी होत असल्याचे अज्ञात व्यक्तीकडून खबर मिळताच मुरुडच्या वनविभागाने कारवाई करत झाडाझुडुपांमध्ये लपवून ठेवलेली अंदाजे २० घन मीटर लाकडे पकडून या खैर तस्करीचा पर्दाफाश केला.

वनविभागाला बुधवारी (दि.९) पहाटेच्या वेळेत अज्ञात व्यक्तीकडून खबर मिळताच मुरुड वनवविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा पौळ यांची टिम तेलवडे येथे पोहोचली व आजुबाजूच्या परिसरात पाहाणी केली असता मोठ्या प्रमाणात खैर तोड झाली असल्याचे व झाडाझुडपात ठेवलेली अंदाजे २० घन मीटर खैर लाकडे (नग) आढळून आले.

मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा पौळ, वनपाल राहुल कुलकर्णी, वनरक्षक विशाल ढोबळे, चेतन चव्हाण यांनी कारवाई करत खैराची लाकडे जप्त करण्यात आली असून माल सुडकोली विक्री आगार येथे जमा करण्यात आला आहे.

वनविभागाच्या क्षेत्रात होणाऱ्या तस्करीबाबत अवैध वृक्षतोड अथवा मालकी क्षेत्रात विनापरवाना वृक्षतोड होत असल्याचे आढळून आल्यास नागरिकांनी तातडीने वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा पौळ यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**उरण** : आवरे येथील प्राथमिक शाळेतील माजी मुख्याध्यापक केशव गावंड यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आत्माराम गावंड, सरपंच निरा पाटील होते. याप्रसंगी श्रवण गावंड याने गुरुपौर्णिमेनिमित्त महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. गुरुपौर्णिमेनिमित्त सर्व शिक्षकांचे केशव गावंड यांनी शिक्षकांचा सन्मान केला. यावेळी मुख्याध्यापक बबन पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अरूणा तिरमाळी, म्हतू आहेर, सीमा कोल्हे, पूजा चव्हाण, रूपाली चव्हाण, रचना गावंड यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

## श्रीवर्धन तालुक्यात पावसाने मारली दडी

**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

यावर्षी पावसाला लवकरच सुरुवात झाली. पण हवामान खात्याने हा पाऊस अवकाळी असल्याचे जाहीर केले होते. परंतु प्रत्यक्षात पाहता हा पाऊस मोसमी पाऊसच सुरू झाला होता.

पावसाने लवकर सुरुवात केल्यामुळे स्वाभाविक शेतकऱ्यांनी आपली भात पेरणी देखील या वेळेला लवकर केली. आता भात लावणी योग्य झालेले असून अनेक उखारु शेतांमध्ये पाणी नसल्यामुळे लावणीची कामे रखडलेली आहेत.

पाणथळ शेतांमध्ये देखील पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. उखारु शेतीची भात लावणी करण्यासाठी जोरदार पाऊस सुरू असावा लागतो व ओढ्याचे येणारे पाणी शेतात आल्यानंतर त्यामध्ये चिखल तयार होतो व भाताची लावणी करता येते. मागील महिन्याभरापासून श्रीवर्धन समुद्रकिनारी जोरदार वारे सुटत असून पावसाचे आलेले ढग पुढे सरकतात. श्रीवर्धन पासून दहा ते पंधरा किलोमीटर लांब म्हसळ्याच्या जवळ गेल्यानंतर पाऊस पडताना दिसतो. परंतु श्रीवर्धन कोरडेच असते.

आता सुद्धा दिवसातून दहा मिनिटं एखाद पावसाची सर कोसळते व एरवी लख्ख सूर्यप्रकाश पडलेला असतो. जर येत्या पाच-सहा दिवसात जोरदार पाऊस झाला नाही तर भात शेतीची लावणी न झाल्याने भाताची रोपे खूप मोठी होतील.

उशिरा लावणी झाल्यानंतर सदरची पिके वाढण्यासाठी खूप उशीर देखील होतो. एकूणच पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतातूर आहे.

---

## उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते मग्रारोहयो फळबाग लागवड



**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

कृषी दिनाचे औचित्य साधत श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते तालुका कृषी विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड गालसुरे येथील शेतकरी दशरथ तुळाजी पड्याळ यांच्या शेतामध्ये ०.४० हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली सदर लागवड प्रसंगी हवामान अनुकूलित शेती तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले

## प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांचा शुभारंभ

**| माथेरान | वार्ताहर |**

मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी शिक्षकांची अपार मेहनत आहे. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी जीवाचे रान करून विविध क्षेत्रात करिअर करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन करत आहेत.

नुकताच मुख्यमंत्री माझी लाडकी शाळा या अभियानात माथेरानच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेला प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता.पहिल्यांदाच या शाळेला अकरा लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले होते यातूनच या शाळेने मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या



मार्गदर्शनाखाली शाळेचा संपूर्ण कायापालट करून पूर्णतः शाळेचे रुपडे पालटले आहे.

या शाळेतील डिजिटल सुविधा त्याचप्रमाणे मुलांना सायकल प्रशिक्षण त्याचप्रमाणे अन्य उपक्रमांचा शुभारंभ प्रशासक राहूल इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी व्यवस्थापन समिती अध्यक्षा ज्योती शिंदे, मुख्याध्यापक दिलीप आहिरे, लक्ष्मण जानू ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, निकीता चव्हाण, मनिषा चौधरी, माधुरी चौधरी, गव्हाणकर शाळेचे मुख्याध्यापक रमेश ढोले, शिक्षक संघपाल वाठोरे यांसह नगरपालिकेचे अधीक्षक सदानंद इंगळे, प्रवीण सुर्वे, लेखापाल भारत पाटील, अमेय, ज्ञानेश्वर सदगीर, अर्जुन पारधी, लक्ष्मण दरवडा आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **सर्वच विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर विविध कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला पाहिजे. यातूनच उद्याचे उत्तम नागरिक घडणार आहेत.– राहुल इंगळे, मुख्याधिकारी तथा प्रशासक माथेरान नगरपरिषद**

---

## व्यंगचित्रकार शि. द.फडणीस यांची सदिच्छा भेट

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

विख्यात व्यंगचित्रकार शि. द. फडणीस हे २९ जुलै २०२५ रोजी वयाची शंभर वर्षे पूर्ण करणार आहेत. त्या निमित्ताने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यासाठी, प्रा.शाम आणि शुभांगी जोगळेकर, दिलीप आणि कुणाल पाटील यांच्यासह पुण्याला गेले होते.



या सदिच्छा भेटीचे वेळी त्यांना कृषीवल दिवाळी अंक, २०२४ सप्रेम भेट देण्यात आला. त्यामध्ये सर्जनशील शतायुषी कलाकार, शि.द. फडणीस हा प्रा. शाम जोगळेकर यांचा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. त्यांच्याशी अनौपचारिक गप्पांच्या वेळी फडणीस काकांनी आपले पहिले व्यंगचित्र १९४५ मध्ये प्रकाशित झाल्याचे सांगितले. अजूनही ते दररोज तास- दीडतास आपल्या कलेची जोपासना करतात, हे ऐकून त्यांच्या विषयीचा आदर द्विगुणित झाला. त्यांची ही सर्जनशीलता अशीच टिकून राहो, अशी सदिच्छा व्यक्त करून कुटुंबियांचा निरोप घेतला.

### नारायण पवार यांचे निधन

**रसायनी :** मोहोपाडा येथील नारायण गणपत पवार यांचे आजारपणाने निधन झाले. मृत्युसमयी ते ७४ वर्षांचे होते.



त्याचा साधा स्वभाव असल्याने ते सर्वांना हवेहवेसे वाटायचे. त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. गोरगरीब जनसामान्यांना मदत करण्यास ते नेहमीच प्रयत्नशील असायचे. त्यांच्या मृत्यु झाल्याचे समजताच त्यांच्या निवासस्थानी व मोहोपाडा स्मशानभूमीवर राजकीय पक्षाचे व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यांनी गर्दी केली.त्यांचा दशक्रिया विधी १७ जुलै रोजी श्री क्षेत्र गुळसूंदे येथे करण्यात येणार असून तेरावे मोहोपाडा येथील राहत्या घरी २० जुलै रोजी होणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुलगे आणि नातवंडे असा परीवार आहे. त्यांच्या जाण्याने मोहोपाडा परिसरावर दु:खाचे सावट पसरले आहे.

## सहकारी शिक्षकांचा केला सन्मान!



**| माणगाव | वार्ताहर |**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन विठ्ठल पाटील यांनी आपल्या सहकारी शिक्षकांचा सन्मान करून शिक्षकांचे कौतुक केले. गुरुवारी (दि.१०) गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विद्यालयात गुरुपूजनाचे आयोजन शालेय छात्र संसदेने व विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन पाटील यांनी केले होते.

विद्यार्थी व छात्रसंसद यांनी आपल्या शिक्षकांना वंदन करून पुष्पगुच्छ व लेखणी भेट देऊन कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापक गजानन पाटील यांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ व लेखणी भेट दिली तसेच सन्मान करीत असताना सांगितले की सहकारी शिक्षक विद्यार्थ्यांसाठी जी मेहनत घेतान व तळमळीने शिकवितात त्यांच्यातील शिक्षणाबद्दल असणारा विचार व समर्पण भाव याचा हा सन्मान असून यामुळे सहकाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल व ज्ञानदानाचे कार्य अत्यंत आनंदी होईल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी तेज म्हशिलकर यांनी केले तर आराध्य धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. गुरु पूजनाच्या निमित्ताने विद्यालयाचे शिक्षक मनोज सुतार व शालेय वाद्यवृंद यांनी सुंदर असे गुरुगीत सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने विद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयास सदिच्छा भेट देऊन सर्व शिक्षकांचा गौरव केला. शिक्षिका विद्या शिर्के यांनी व विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेबद्दल माहिती सांगून गुरुपूजनाचे महत्त्व अधोरेखित केले. गुरुपूजनाच्या या कार्यक्रमात शाळेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणामध्ये गुरु पुजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

---

### प्रोसेसिंग युनिटची चोरी

**पनवेल** : जिओ टॉवरच्या प्रोसेसर युनिट आणि पार्टसची चोरी केल्याप्रकरणी अज्ञातांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समृद्ध मुकुंद अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी महाराज रोड, पनवेलमधील साईट बंद झाली असून, त्याठिकाणी काहीतरी बिघाड झाला असल्याची माहिती दिनेश म्हसकर यांना मिळाली. त्यांनी साइटवर जाऊन पाहिले असता, जिओ टॉवरचे प्रोसेसर युनिट दिसून आले नाहीत. साईटवर कोणीही नसल्याचे पाहून अज्ञात चोरांनी तेथे असणारे सामान चोरुन नेले आहे. या प्रकरणी त्यांनी गुन्हा दाखल केला आहे.

**उपायोजना कधी होणार नागरिकांचा प्रशासनाला सवाल**

# कर्जतमध्ये ट्रॅफिक समस्या कायम

**| कर्जत | वार्ताहर |**

कर्जत शहराची ट्रॅफिकची समस्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे, यावर कोण आणि कधी उपाययोजना करणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

कर्जत शहराचे मुख्यप्रवेशद्वार असलेल्या चार फाट्यावरून कर्जत शहरात प्रवेश करताना लागणारा रेल्वेचा पूल या पुलावर नेहमीच ट्रॅफिक जाम होत असते तसेच कर्जत शहरातून मुरबाडकडे किंवा अन्य भागाकडे जाण्यासाठी उल्हास नदीवर असलेल्या श्रीराम पुलावर ट्रॅफिक जाम होत असल्याने सर्वसामान्य नागरिक कंटाळा आहे.

हीच परिस्थिती आता कर्जत शहरातील चौकांमध्ये दिसायला मिळत आहे, बेशिस्त वाहन चालक कुठेही कशीही गाडी पार्क करून निघून जातात त्यामुळे ट्रॅफिक समस्या दिवसं दिवस वाढतच चालली आहे, यामुळे सर्वसामान्य पादचारी कंटाळला आहे

स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब राऊत चौक ते कर्जत मुरबाड हायवेवर जाणाऱ्या रस्त्यावर बँक, चार शाळा, न्यायालय आणि प्रशासकीय भवन आहे त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते आता ह्याही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ट्राफिकची समस्या उद्भवत आहे. शुक्रवारी (दि.११) भाऊसाहेब राऊत ते टेकडीकडे जाणारा रस्ता तसेच भाऊसाहेब राऊत ते मुरबाड हायवेकडे जाणारा रस्ता, या रस्त्यावर शुक्रवारी दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जाम झाली होती, हे चित्र सध्या रोजच दिसत आहे.

ही समस्या कोण आणि कशी सोडवणार यावर काय उपाययोजना करणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक प्रशासनास विचारात आहेत.



# त्यांची भीती एकच- मार्क्स

जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आवाजी मतदानाने संमत झाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे विनोद निकोले यांचा एकमेव अपवाद वगळता या विधेयकाला एकाही विरोधी आमदाराने विरोध केला नाही. कॉंग्रेस, शरद पवारांचे राष्ट्रवादी, ठाकरे सेना इत्यादींच्या आमदारांनी काही शंका वा आक्षेप जरूर घेतले. पण अंतिमतः हे विधेयक सहजपणे मंजूर होऊन गेले. आता विधानपरिषदेतही हेच होईल व लवकरच जनतेची सुरक्षा करण्याच्या नावाखालचा एक कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात येईल. शहरी भागातील नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मुख्यतः या कायद्याचा वापर केला जाईल असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. शिवाय, कोण्या व्यक्तीविरुध्द नव्हे तर संघटनांविरुध्दच कारवाई करण्यासाठी तो वापरला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तरीही या कायद्याची मुळात गरज काय होती हा प्रश्न शिल्लक आहे. फडणवीसांच्याच म्हणण्यानुसार महाराष्ट्रातला नक्षलवाद आता संपुष्टात आला असून तो दोन तालुक्यांपुरता मर्यादित आहे. तोही लवकरच संपून जाईल असा त्यांचा विश्वास आहे. सरकारने ज्या वेगाने नक्षलवाद्यांना ठार मारण्याचे सत्र आरंभले आहे ते पाहता तसे होईलही कदाचित. पण तरीही सरकारला भीती कसली आहे तर, थेट शस्त्र हाती न घेता डाव्या विचारांचा प्रसार करू पाहणाऱ्या लोकांची. हे कार्यकर्ते शहरात छुप्या रीतीने राहून राज्यघटनेच्या व येथील लोकशाही व्यवस्थेच्या विरोधात काम करीत असतात असे त्यांना वाटते. एकीकडे देशातला नक्षलवाद पुढच्या वर्षीपर्यंत संपेल असे अमित शाह सारखे सांगत असतात. म्हणजे, शस्त्रांच्या लढाईत हे सरकार यशस्वी ठरणार असल्याची खात्री भाजपला वाटते. मात्र या डाव्या मंडळींसोबत विचारांची लढाई आपण लढू शकणार नाही हेही त्यांना पक्के ठाऊक आहे. म्हणूनच त्यांना लगोलग हा कायदा आणावा लागतो. अर्थात, कायदा म्हटले म्हणून तो आपोआप पवित्र होत नाही. कारण, त्याच्या मागचे हेतू कुटील आहेत आणि या कायद्याची भाषा व सरकारचा पूर्वेतिहास पाहता तो अत्यंत खुनशीपणे डाव्या कार्यकर्त्यांविरुध्द वापरला जाणार आहे हे स्पष्ट दिसते आहे.

## भीमा–कोरेगावचा अनुभव

याच फडणवीस सरकारने भीमा कोरेगाव प्रकरणात नक्षलवादी असल्याच्या संशयावरून अनेकांना अटक केली. हे लोक नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट रचत होते असेही सांगितले गेले. त्यांच्याविरुध्द ढीगभर पुरावे असल्याचे दावे केले गेले. पण प्रत्यक्षात सहा वर्षे झाली तरीही हा खटला चालू झालेला नाही. सरकारने खरे तर इतक्या गंभीर खटला जलदगती न्यायालयात चालवून दोषी ठरतील त्यांना शिक्षा द्यायला हवी. त्यामुळे संभाव्य नक्षलवाद्यांना जी जरब बसवायची आहे तो हेतू साध्य होईल. पण सरकार असे करू धजावणार नाही. कारण भीमा कोरेगाव प्रकरणात सरकारने खोटे पुरावे तयार केला असल्याचा संशय आहे. आरोपींच्या संगणकामध्ये व्हायरस घुसवून त्यांच्या नावाने खोटी पत्रे वा पत्रके तयार केली गेली असावीत असा निष्कर्ष अमेरिकी यंत्रणांनी काढला आहे. हा निष्कर्ष आपल्या कोर्टांपुढेही मांडला गेला आहे. पण दुर्दैवाने या न्यायालयांनी त्याकडे फार लक्ष दिलेले नाही. आता समजा हा खटला न्यायालयात चाललाच, तर सरकारवरच्या या खोटेपणाच्या आरोपांचीही शहानिशा होईल. आरोपींच्या वकिलांना सरकारची उलटतपासणी करता येऊ शकेल. तसे झाले तर सरकारचा खोटेपणा उघडकीस आणता येईल. त्यासाठीच हा खटला घेण्याचे टाळले जात आहे. अनेक आरोपींना खटल्याला उशीर होत असल्याच्या कारणावरून जामीन मिळाला आहे. हा जामीनही मिळू नये म्हणून सरकारने प्रचंड आटापिटा केला. पण शेवटी राज्यघटनेने दिलेले संरक्षण या कार्यकर्त्यांच्या कामी आले. त्यांना सोडावे लागले. या एका प्रकरणावरून हे लक्षात येईल की, सरकारचा काही विशिष्ट संघटनांवर राग आहे व त्यांना नष्ट करण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकते. जनसुरक्षा कायदा राज्यांनी करावा अशी सूचना केंद्राने केलेली होती. म्हणजे मोदी–शाह यांचा हा अजेंडा आहे. त्यामुळे फडणवीस त्याची अंमलबजावणी करणार हे अपेक्षितच आहे. ज्या मोदी, शाह, फडणवीस इत्यादींनी आजवर इडी, सीबीआय व इतर कायद्यांच्या आधारे विरोधकांवर वाटेल तसे गुन्हे दाखल करून ठेवले ते लोक जनसुरक्षा सारख्या काळ्या कायद्यांचा किती गैरवापर करतील याचा अंदाजच केलेला बरा.

## विरोधकांकडून निराशा

या विधेयकाला गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात विरोध चालू आहे. त्यामुळे सरकारला विधिमंडळात त्याच्या विचारासाठी सर्व पक्षांच्या आमदारांची मिळून एक संयुक्त चिकित्सा समिती नेमावी लागली. मात्र हेही फडणवीस सरकारच्या पथ्यावरच पडले. कारण, असे केल्याने हे विधेयक सर्वसहमतीने तयार झाल्याचा देखावा सरकारला करता आला. शिवाय, गुरुवारी जेव्हा ते अंतिमरीत्या मंजूर झाले तेव्हा विरोधकांनी काही मोजके आक्षेप घेण्यापलिकडे काहीही केले नाही. या विधानसभेत दत्ता पाटील, गणपतराव देशमुख, मृणाल गोरे यांच्यासारखे आमदार असते तर सरकारला हे साध्य झाले नसते. संयुक्त चिकित्सा समितीकडे राज्यातील बारा हजार लोकांनी या कायद्याबाबत सूचना केल्या होत्या. मात्र त्यातल्या केवळ तीन स्वीकारण्यात आल्या अशी माहिती काल मुख्यमंत्र्यांनी दिली. हा कायदा कोण्या एका व्यक्ती किंवा आंदोलनाविरुध्द वापरला जाणार नाही अशी हमी त्यांनी दिली. पण या कायद्याची भाषा इतकी संदिग्ध आहे की, उद्या महागाईविरुध्दचे आंदोलन, शक्तीपीठाविरुध्दची शेतकऱ्यांची निदर्शने किंवा अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मोर्चेदेखील या कायद्याच्या कक्षेत सहजपणे आणता येऊ शकतील. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था यांना बाधा आणणारी कोणतीही कृती या कायद्यानुसार कारवाईला पात्र ठरेल. प्रशासनाला कोणत्याही नियमाची वा कायद्याची अंमलबजावणी करण्यात अडथळा आणला असे कारण देऊनही या नव्या कायद्यानुसार लोकांना तुरुंगात फेकून देता येईल. ही व्याख्या पाहता हिंदी–सक्तीच्या विरोधात फेसबुकवरून कोणी काही लिहिले वा एखादी बैठक घेतली तरी ती कृतीदेखील सरकारी निर्णयाच्या अंमलबजावणीतील अडथळा ठरवला जाऊ शकते. हे सर्व लक्षात घेता विरोधकांनी याला शेवटपर्यंत कडाडून विरोध करायला हवा होता. विधेयक संमत होताना मतविभागणी मागायला हवी होती व विधेयक संमत होताना किमान सभात्याग करून आपला निषेध नोंदवायला हवा होता. यातले काहीच न घडल्याने सरकारने विरोधकांना इतके कसे काय गुंडाळले असा सवाल निर्माण झाला आहे. आता निदान विधानपरिषदेत तरी विरोधी सदस्य अधिक ठाम भूमिका घेतील अशी आशा आहे. या कायद्याचा दुरुपयोग होणार नाही असे फडणवीस आज कितीही साळसूद निरागसपणे सांगत असले तरी तो विरोधकांना दडपण्यासाठीच आणला गेला आहे यात अजिबात शंका नाही. या सरकारला मार्क्सवादाचा विचार मुळापासून उखडून टाकायचा आहे. कारण भविष्यात हाच विचार भाजपच्या धर्मांध राजकारणाला शह देऊ शकतो याची त्यांना खात्री आहे.

विचार

# ओमानचे ‘करदायी’ पाऊल

*कच्च्या तेलाने आखाती देशांची अर्थव्यवस्था चमकवत जगभरातून गुंतवणूक आकर्षित केली. तथापि, आता या देशांना तेलावरील अवलंबित्व कमी करायचे आहे. त्यासाठी ओमानने विद्यमान कररचनेत बदल करत ठराविक नागरिकांकडून कर आकारण्याचा व्यावहारिक पर्याय अवलंबला आहे. हे धोरण सामाजिक आणि आर्थिक गरजांसह आर्थिक संतुलन साधण्यात यशस्वी झाल्यास आखाती देशांच्या करधोरणात मोठा बदल ठरू शकते.*



प्रा. जयसिंग यादव

आखाती देशांमध्ये प्रथमच ओमानने आपल्या नागरिकांवर प्राप्तिकर लादण्याचा निर्णय घेतला आहे. ओमान सरकारच्या घोषणेनुसार, २०२८ पासून वार्षिक उत्पन्न १,०९,००० डॉलर किंवा त्याहून अधिक असणाऱ्यांकडून पाच टक्के प्राप्तिकर वसूल केला जाणार आहे. अशा प्रकारे सध्या ओमानच्या फक्त एक टक्के लोकांकडून उत्पन्न कर वसूल केला जाईल. ओमानशिवाय इतर आखाती देश त्यांच्या नागरिकांवर कर लादण्याचा विचार करत आहेत की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने असे भाकित केले आहे की येत्या काही वर्षांमध्ये आखाती देश उत्पन्नात विविधता आणण्यासाठी नागरिकांकडून कर आकारण्यास सुरुवात करतील. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल उद्योगातून येतो. आखाती देशांमध्ये कोणताही कर लागत नसल्यामुळे जगभरातील लोक या देशांकडे आकर्षित झाले आणि गुंतवणूक केली. ओमानच्या अर्थमंत्र्यांनी सांगितले, की जागतिक ऊर्जा बाजारपेठांमधील चढउतारामुळे ओमानने तेलावरील आपले महसूल अवलंबित्व कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल आणि वायूच्या विक्रीतून येतो. ओमान बऱ्याच काळापासून नागरिकांवर उत्पन्न कर लादण्याचा विचार करत होता. २०२० मध्ये ओमानने आपल्या अर्थव्यवस्थेत अनेक बदल केले. त्यात जनतेवरील कर्ज कमी करणे आणि आर्थिक वाढीला चालना देण्याचा विषय समाविष्ट होता. ओमान आपल्या २०४० पर्यंतच्या नियोजनाअंतर्गत हे बदल करत आहे. ओमान आपल्या देशाची अर्थव्यवस्था तंत्रज्ञानावर आधारित बनवू इच्छितो.

ओमान हा ‘गल्फ कोऑपरेशन कौन्सिल’ (जीसीसी)चा पहिला सदस्य बनणार आहे, जिथे जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना उत्पन्न कर भरावा लागेल. सरकारच्या घोषणेनुसार ४२ हजार ओमानी रियाल (सुमारे ९३.५ लाख रुपयां) पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्नावर पाच टक्के कर आकारला जाईल. हा कर ओमानी नागरिकांसह देशात काम करणाऱ्या परदेशी लोकांनाही लागू होईल. ‘जीसीसी’ चे उर्वरित पाच सदस्य देश तेल आणि वायूने समृद्ध आहेत आणि तिथे वैयक्तिक उत्पन्नावर कोणताही कर आकारला जात नाही. या करमुक्त वातावरणामुळे सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतार सारखे देश परदेशी कामगारांसाठी आकर्षक बनतात. २०२४ मध्ये ओमानच्या एकूण सरकारी उत्पन्नाचा मोठा भाग म्हणजे सुमारे १९.३ अब्ज डॉलर तेलातून आला; परंतु अर्थमंत्री सईद बिन मोहम्मद अल–सकरी म्हणतात की या नवीन करामुळे सरकारी महसुलाच्या स्रोतांमध्ये विविधता येईल आणि तेलावरील अवलंबित्व कमी होईल. ओमानकडे इतर आखाती देशांपेक्षा कमी संसाधने आहेत. त्यामुळे अंतर्गत आणि बाह्य दबावांमुळे हा कर लागू करण्यात आला आहे. अनेक दशकांपासून कच्च्या तेलावर अवलंबून राहिल्यामुळे ओमानच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या चढउतारांना सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक कर्जात वाढ आणि कल्याणकारी योजनांवरील वाढता खर्च हीदेखील यामागील कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या संस्थांच्या शिफारशींमुळे ओमानला पारदर्शक आर्थिक सुधारणांकडे वाटचाल करण्यास प्रेरणा मिळाली. हा निर्णय ओमानमध्ये आधीच लागू असलेल्या व्यापक कर रचनेचा भाग बनेल.

ओमानमध्ये आधीच चार प्रकारचे कर लागू आहेत, ते म्हणजे मूल्यवर्धित कर (व्हॅट), कॉर्पोरेट कर, उत्पादन शुल्क कर आणि मिठाईवरील कर. उत्पन्न कर हा या प्रणालीतील शेवटचा आणि आवश्यक दुवा आहे. या कायद्यानुसार, ४२ हजार ओमानी रियालपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्यांना करातून सूट दिली जाईल. त्यामुळे ९९ टक्के लोकसंख्येला नव्या करापासून दूर ठेवले जाईल. यामुळे मध्यम आणि निम्न उत्पन्न गटांवर कोणताही भार पडणार नाही. तथापि, या कराचे काही नकारात्मक परिणामदेखील होऊ शकतात. काही लोक कर टाळण्यासाठी देश सोडून जाऊ शकतात आणि परकीय गुंतवणूकदेखील कमी होऊ शकते; परंतु यामुळे ओमानची आर्थिक पारदर्शकता वाढेल आणि सरकारी खर्चात सुधारणा होईल. सरकारने व्यवसायावर परिणाम न करणाऱ्या करांसह काही सूट आणि प्रोत्साहने द्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उदाहरणार्थ, स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि परदेशी गुंतवणुकीला कर सवलत देणे. अर्थात आणखी एक भीती आहे, ती म्हणजे लोक कर चुकवण्याचे मार्ग शोधतील. विशेषतः मर्यादित आकाराच्या अर्थव्यवस्थेत देखरेख यंत्रणा मजबूत नसलेल्या ओमानसारख्या देशात हे सहजशक्य आहे. आता ओमानमध्ये काही लोक कर टाळण्यासाठी अकाउंटंट शोधू लागले आहेत. या करामुळे परदेशी गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो आणि ओमानमधून भांडवल बाहेर जाऊ शकते. खऱ्या श्रीमंतांकडून कर वसूल करणे आव्हानात्मक असेल. कारण ते अनेकदा आपले भांडवल परदेशात पाठवतात.

सरकारने कॉर्पोरेट कर आणि व्हॅट सारखे विद्यमान कर अधिक प्रभावी करावेत, असा एक पर्याय अर्थतज्ज्ञ सुचवतात. हा कर एक टक्क्याऐवजी सहा टक्के करण्याची शिफारस काही तज्ज्ञ करतात. त्यामुळे सामान्य लोकांवर कमी परिणाम होईल आणि महसूलही वाढू शकेल. आखाती सहकार्य संघटनेच्या उर्वरित सदस्य देशांमध्ये उत्पन्न कराची कोणतीही तरतूद नाही. २०२४ साठी ओमानचा एकूण अर्थसंकल्प सुमारे ३०.२६ अब्ज डॉलर होता. २०२८ पासून लागू होणाऱ्या उत्पन्न करातून मिळणारा अंदाजे महसूल फक्त २३० दशलक्ष डॉलर असेल. कराची उपयुक्तता केवळ आर्थिक फायद्यांमध्येच नाही, तर चांगली देखरेख, डेटा आणि व्यवस्थापनातही आहे. कर पारदर्शक आणि समान पद्धतीने अंमलात आणला गेला, तर सामाजिक न्यायाचे एक महत्त्वाचे साधन बनू शकतो. केवळ उच्च उत्पन्न असलेल्यांवर कर लावल्याने आर्थिक जबाबदारीचे संतुलन दिसून येते; परंतु शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान सुधारण्यासाठी कर उत्पन्न वापरले जाणे महत्त्वाचे आहे; जेणेकरून लोकांना आपण देशाच्या विकासात योगदान दिले आहे, असे वाटेल. ओमान हे धोरण यशस्वीरित्या अंमलात आणू शकला, तर ते इतर आखाती देशांसाठी एक उदाहरण बनू शकते. ‘जीसीसी’ देशातील करमुक्त वातावरण हा या देशांच्या गुंतवणूक धोरणाचा आधार आहे. सरकारच्या दृष्टिकोनातून ही करप्रणाली आर्थिक स्थिरता आणि सामाजिक संतुलन आणण्याचा प्रयत्न आहे; परंतु त्याचे गुंतवणूक आणि ‘ब्रेन ड्रेन’सारखे संभाव्य नकारात्मक परिणाम अजूनही वादाचा विषय आहेत.

काही तज्ज्ञांचा विश्वास आहे, की विद्यमान कररचनेत सुधारणा करणे हा अधिक व्यावहारिक आणि कमी धोकादायक पर्याय आहे. ओमानच्या या उपक्रमाकडे आता संपूर्ण आखाती प्रदेशात कुतुहलाने पाहिले जात आहे. हे धोरण सामाजिक आणि आर्थिक गरजांसह आर्थिक संतुलन साधण्यात यशस्वी झाल्यास आखाती देशांच्या कर धोरणात एक मोठा बदल ठरू शकते. बहुतेक ‘जीसीसी’ देशांची आर्थिक स्थिती मजबूत आहे. या वर्षी फक्त सौदी अरेबिया आणि बहरीनमध्येच तूट येण्याची शक्यता आहे; परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटले आहे की, या देशांनाही उत्पन्न कराची आवश्यकता असू शकते. याचे कारण म्हणजे जीवाश्म इंधनाची जागतिक मागणी कमी होत आहे.

ओमान तेल उत्पन्नावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सुधारणा करत आहे. हे इतर आखाती देशांसारखेच आहे. ओमानने खासगीकरणाद्वारे पैसे उभारले आहेत. यामध्ये गेल्या वर्षी त्यांच्या सरकारी ऊर्जा कंपनीच्या शोध आणि उत्पादन युनिटच्या दोन अब्ज डॉलर आयपीओ (प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग)चा समावेश आहे. हा एक विक्रम आहे. ओमानने उत्पन्न कर लादल्याने भविष्यात इतर ‘जीसीसी’ देशांनाही कर लादण्यास प्रेरित करता येईल. आतापर्यंत आखाती देशांमध्ये कोणताही उत्पन्न कर नव्हता. याचा फायदा तेथे काम करणाऱ्या परदेशी कर्मचाऱ्यांना होत होता; परंतु आता ओमानने हा बदल केला आहे. यामुळे इतर देशांवरही असेच करण्याचा दबाव वाढू शकतो.

चर्चा आजची

# मच्छिमारांचा विचार होणे गरजेचे



प्रमोद जाधव

रेवस – रेड्डी सागरी महामार्ग उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. रेवदंडा – साळाव पुलाच्या जागी दुसऱ्या बाजूला नवीन पुल बांधला जाणार आहे. ज्या परिसरात पुल बांधला जाणार आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कांदळवन आहे. मच्छिमारांचा रहिवास आहे. त्यामुळे नव्या पुलामुळे स्थानिक मच्छीमारांच्या रोजगारावर कुऱ्हाड चालविली जाण्याची शक्यता आहे. नव्या पुलामुळे पर्यटन वाढीला गती मिळणार आहे. परंतु हा पुल तयार करण्यापुर्वी तेथील मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचे कायमचे साधन बंद होणार नाही. याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. रेवदंड्यातील स्थानिक मच्छिमारांच्या मासेमारीवर परिणाम होणार नाही, याचा विचार पुल उभारणीच्या पुर्वी शासनाने करावा, अशी प्रतिक्रिया उमटत आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत बॅ. ए. आर. अंतुले यांच्या कारकिर्दीत रेवदंडा – साळाव पुलाची उभारणी करण्यात आली होती. या पुलामुळे रेवदंडा, रोहा, अलिबाग हे तीन तालुके एकत्र आले. आज हा पुल जूना झाला आहे. वारंवार डागडूजी करून पुलाचीदेखभाल दुरुस्ती करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते. काही महिन्यापुर्वी कोट्यावधी रुपये खर्च करून साळाव येथील जून्या पुलाची दुरुस्ती करण्यात आली. हा पूल वाहतूक धोकादायक ठरल्याने त्याची दुरुस्तीचे काम युध्द पातळीवर करण्यात आले. त्यामुळे हा पुल आता वाहतूकीसाठी मोकळा झाला आहे.

अलिबाग–रोहा व मूरूड या तीन तालुक्यांना जोडणारा पुल पर्यटकांसह स्थानिकांसाठी फायदेशीर ठरत आहे. या पुलाच्या जागी नवीन पुल बांधण्याची हालचाल गेल्या अनेक वर्षापासून आहे. रेवस ते रेड्डी सागरी महामार्गामध्ये रेवदंडा–साळाव पुल घेण्यात आले आहे. जून्या पुलापासून जवळपास तीनशे मीटर आत रेवदंडा जेट्टीच्या बाजूला हा पूल उभारला जाणार आहे. पुलासाठी परिसरातील कांदळवनाची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात येणार आहे. विकासाच्या नावाखाली पर्यावरण व स्थानिक मच्छिमारांच्या रोजगारावर चालविली जाणारी कुऱ्हाड स्थानिकांसह पर्यावरणप्रेमींना मान्य नाही. समुद्र लाटांबरोबर होणारी जमिनीची धूप ही कांदळवने थांबवते. कांदळवनामुळे समुद्रातील अन्नसाखळी टिकून राहते. पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच सागरी संपत्तीचे जतन करण्यासाठी कांदळवन संरक्षण ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वन विभागाने कांदळवनाच्या संरक्षणासाठी कडक पावले उचलली आहे. परंतु आता विकासाच्या नावाखाली शासनाकडूनच या कांदळवनाची तोड होणार आहे.कांदळवनाच्या कतलीमुळे झिंगा, खेकडे व इतर जलचर प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता असताना तेथील स्थानिक मच्छीमारांच्या मासेमारी व्यवसायावरही परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा सध्या जोरात सुरु आहे.

ज्या जागेत पुल बांधले जाणार आहे. त्याखाली आणि परिसरात मोठ्या प्रमाणात मच्छिमारी करणाऱ्यांची वस्ती आहे. पेरा लावून खाडीतून मासे पकडण्याचे काम मच्छीमार करतात. त्यामुळे मच्छिमारांचा रोजगार जाऊ शकतो अशी प्रतिक्रिया उमटत आहे. विकास होत असताना स्थानिक मच्छिमारांचा विचार होणे देखील गरजचे आहे. नव्या पुलाच्या जागेची स्थळ पाहणी करून अहवालसुध्दा मंडळ अधिकारी यांच्याकडून तयार करण्यात आला आहे.त्यामुळे नवे पुल होताना स्थानिकांच्या रोजगाराचा विचार होणे गरजेचे आहे. मासेमारीसाठी रेवदंडा बंदराची एक वेगळी ओळख आहे. ऐतिहासिक बंदर म्हणून या बंदराकडे पाहिले जाते. या बंदरालगत असलेल्या मच्छीमारांच्या रोजगारावरच कुऱ्हाडीचे घाव घालण्याचा डाव शासनाने आखला असल्याचे चित्र यातून स्पष्ट होत आहे.

या भागातील असंख्य मच्छिमार मासेमारी करून त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. मात्र या पुलामुळे हा रोजगारच नष्ट होण्याची चर्चा सध्या सुरु आहे. त्यामुळे मच्छीमारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. शासनाने मच्छिमारांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे गांभीर्याने बघणेदेखील गरजेचे आहे. त्यांना कायमचा रोजगार कसा प्राप्त होईल. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मासेमारी हे रोजगाराचे साधन बंद पडल्यास मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जाण्याची वेळ मच्छिमारांवर येणार आहे. मच्छिमारांचे नुकसान होणार नाही. कांदळवन तोडीमुळे समुद्रातील जैवविविधता नष्ट होणार नाही याकडेदेखील शासनाने बघून विकास साधण्याची गरज आहे.

लोकसंसद

## माझ्या शेतकरी आईची दूरदृष्टी

माझ्या आईचे माहेर राजापूर तालुक्यातील. ताम्हाणे येथील विष्णू ताम्हाणकर यांच्या घरात जन्म झाला. आठ बहिणींमध्ये हिचा क्रमांक सहावा होता. दोन भाऊ, आई–वडील एवढे मोठे कुटुंब. विवाहानंतर तिचे सासर लांजा तालुक्यातील गोळवशी येथील. शिवराम गोळवसकर यांच्याशी विवाह झाला. शेतकरी कुटुंबात आली. घरात दिर, जावा, त्यांची मुले, सासु, सासरे, जनावरे– गुरे वासरे, गाई, म्हशी, बैल, घर, दोन वाडे एवढा मोठा परिवार. उदरनिर्वाह शेतीवर. माझे वडील मुंबईतील न्यु मिल कापड गिरणीत कामगार होते. ते खाणावळीत राहून एका ठिकाणी जेवायला तर दुसऱ्या ठिकाणी झोपायला असा त्यांचा दिनक्रम होता. कौल तोडणीच्या वेळी झाडांवर चुढून कौल तोड करी. तिला विवाह समारंभात गाणी म्हणण्याची आवड होती, तांबीट गवतापासून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचा छंद होता. मी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १९७१ साली चौथी पास झालो. तेव्हा माझ्या आईने मोठा निर्णय घेतला माझे पुढील शिक्षण मुंबई व्हावे अशी तिची इच्छा होती. वडील कुर्ल्यातील तानाजी चौकातील एका कुटुंबात खानावळीत होते. माझ्या वडीलांनी त्यांना विचारले होते की, माझ्या मुलाला शिक्षणाकरता मुंबईत बोलत आहे त्याला जेवायला ठेवाल काय? तेव्हा मी अकरा वर्षाचा होतो. त्यांनी होकार देताच वडीलांनी आईला कळविले. गावातील मुंबईत येणाऱ्या कोणाबरोबर मला पाठवा असा निरोप दिला. माझ्या शेतकरी आईचा तो निर्णय माझ्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा ठरला. कुर्ल्यातील मॅचफॅक्टरी लेन येथील मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत वडीलांच्या ओळखीच्या व्यक्तींनी इयत्ता पाचवीत प्रवेश मिळवून दिला. अतिशय कठीण परिस्थितीत माझे बालपण मुंबई गेले. शिक्षण झाले. नोकरी मुंबई महानगरपालिकेत मिळाली. विवाह झाला. आईच्या दूरद्रुष्टीचा माझ्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. माझ्या पुढची पिढीने एक पाऊल पुढे टाकून अभियांत्रिकीत पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी मुलगा अमेरिकेत गेला. माझ्या आईचे निधन १२ जुलै २०१० रोजी निधन झाले. आईच्या चरणी नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करतो.आई विना सर्व व्यर्थ आहे हेच खरे.प्रचंड मेहनत, वेदना सहन करून आपल्या कुटुंबाकरता अहोरात्र झटते तरी कधीच नाराजी व्यक्त करीत नाहीत हीच माय माऊली चंदनासारखी झिजते, हे मला मी बाप झाल्यावर कळले. आईच्या आईपणास भावपूर्ण आदरांजली.

**– महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**

## आता गणेशोत्सव राज्योत्सव होणारं?

चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती अर्थात आपल्या लाडक्या गणरायांचे आगमन यंदा २७ ऑगस्ट रोजी होत असून आता यापुढे गणेशोत्सव महाराष्ट्रात राज्योत्सव म्हणून साजरा केला जाईल यासंबंधी लवकरच राज्य शासन घोषणा करेल अशी माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिल्याचे वृत्त आहे निश्चितच हि बातमी स्वागतार्ह म्हणावी लागेल. सामाजिक बांधिलकी, एकोपा, सगळ्यांनी संघटीत तसेच सामाजिक, धार्मिक, देशभक्तीपर सजिव देखाव्यांच्या माध्यमातुन समाज प्रबोधन व्हावे हा उद्देश ठेवून बाळ गंगाधर टिळक यांनी सन १८९३ मध्ये गणेशोत्सवाचा प्रारंभ केला. हा गणेशोत्सव भारतीयांसाठी आकर्षण ठरला असून हा महोत्सव पाहण्यासाठी देशविदेशातील भक्तांमध्ये क्रेझ निर्माण झाली आहे. गणेशोत्सव भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील मोठ्या दिमाखाने साजरा केला जातो. जगभरातील १७० देशांमध्ये गणेशोत्सव साजरा करत असल्याचे बोलले जाते अशा गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य उत्सव म्हणून मान्यता मिळत असल्याने अनेक लहान मोठ्या उद्योगांना उभारी मिळणार आहे. गणपती बाप्पा सर्वच भक्तांचे श्रद्धास्थान आहे कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात गणरायांना वंदूनच होते.

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# स्वराज्यनिष्ठ बाजी प्रभू देशपांडे

मराठा साम्राज्याचे लढवय्ये शूर योद्धे म्हणून आज इतिहासात बाजीप्रभू देशपांडेंचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. रामजींसाठी जसे हनुमान होते तसे शिवबांसाठी बाजी प्रभू होते. बाजी प्रभू यांनी पावनखिंडच्या (घोड खिंड) युद्धात आपले प्राण गमावून छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राणाचे रक्षण केले. मराठा इतिहासात यांचे योगदान अविस्मरणीय आहे.

बाजी प्रभू देशपांडे पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील हिरडस मावळातले पिढीजात देशपांडे होते. बाजी प्रभू हे हिरडस मावळचे वतनदार असणाऱ्या बांदलांचे दिवाण होते. परंतु बाजींचे प्रशासकीय कौशल्य आणि शौर्य पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपलेसे करून घेतले. बाजींनीही स्वराज्यासाठी आपली निष्ठा शिवाजीराजांना समर्पिली. बाजीप्रभू देशपांडे हे पराक्रमी लढवय्ये तर होतेच, तसेच ते त्यागी, स्वामिनिष्ठ, करारी, कोणत्याही आमिषाला बळी न पडणारे असे होते.सिद्धी जौहरने पन्हाळ्याला घातलेल्या वेढ्यातून सुटण्यासाठी महाराजांना घेऊन बाजी विशाळगडाकडे निघाले होते. बाजीप्रभू हे बांदल यांचे सरदार होते. रायाजी बांदल, फुलाजी प्रभू आणि सुमारे ६०० बांदल मावळे यावेळी महाराजांच्या समवेत होते. त्या वेळी आपली फसवणूक झाली हे लक्षात येऊन विजापुरी सैन्य त्यांचा पाठलाग करीत होते. पुढचा धोका लक्षात घेऊनच वडीलकीच्या अधिकाराने बाजींनी महाराजांना विशाळगडाकडे पुढे जाण्यास सांगितले. बाजी व फुलाजी हे दोघे बंधू गजापूरच्या खिंडीत (घोडखिंडीत) सिद्धीच्या सैन्यासाठी महाकाळ म्हणून उभे राहिले. हजारोंच्या सैन्याला ३०० मराठी मावळ्यांनी रोखले होते. सतत २१ तास चालून शरीर थकलेल्या स्थितीत असतानाही बाजी आणि त्यांच्या मावळ्यांनी मोठ्या हिंमतीने १८ तास निरंतर खिंड लढविली आणि पराक्रमाची शर्थ केली.

सिद्धी मसूदचे सैन्य अडविताना कामी आलेले मराठी मावळे, धारातीर्थी पडलेले बंधू फुलाजी, जखमी झालेले स्वतःचे शरीर या कशाचेही भान बाजींना नव्हते. महाराज विशाळगडावर सुखरूप पोहोचले याचा इशारा देणाऱ्या तोफांच्या आवाजाकडे त्यांचे कान होते. तोफांचा आवाज ऐकेपर्यंत ते दोन्ही हातात तलवार घेऊन प्राणांची बाजी लावून लढत होते. खिंडीमध्ये महादेवाचा महारुद्र अवतार प्रकटलेला होता. १८ तास निरंतर युद्ध करत बाजी प्रभू मातृभूमीला समर्पित होऊन गेले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ जुलै

१)श्री.शशिकांत देवजी कवळे परहूर, अलिबाग, १२-७-१९४४

२) श्रीम.निर्मला काशिनाथ गायकवाड श्रीबाग-२,अलिबाग, १२-७-१९५६

३) श्री.नरहरी दामोदर पाटील श्रीबाग-२,अलिबाग, १२-७-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते




**स्व. डॉ.सरोज भास्कर तांबोळी, स्मरणार्थ, तांबोळी हॉस्पिटल अलिबाग**



**डॉ. मनिषा मेश्राम, वाढदिवस अलिबाग**

## गुरु-शिष्य अद्वितीय जोडी



आपल्या बुद्धीचे ठिकाणी सर्वांच्या विषयी समभाव आल्याशिवाय, समत्व आल्याशिवाय आपल्याला भगवंताशी एकरूप होता येणार नाही.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# पाण्यावाचून हाल

## ● चिरनेरमध्ये दोन दिवस नळाला पाणीच नाही

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर परिसरात नळाद्वारे येणारे पाणी दोन दिवस आले नसल्यामुळे पाण्यावाचून नागरिकांची मोठी पंचाईत झाली. भरपावसाच्या दिवसात पाण्या वाचून नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. यावेळी येथील नागरिकांना एकेकाळी अमृतकुंभ ठरलेल्या आपल्या विहिरीची आठवण झाली. पूर्वपार ग्रामीण भागातील ग्रामस्थांची तहान भागवत असलेल्या विहिरींकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायला नको होते. या विहिरींची योग्य प्रकारे निगा राखली असती, तर पाणी स्वच्छ राहिले असते. त्याचा वापर कपडे धुणीभांडी व इतर कामासाठी करता आला असता.

चिरनेरग्रामपंचायतहद्दीतील विहिरींसह चिरनेर गावात काही खासगी मालकीलकीच्या विहिरी आहेत. परंतु, अलीकडच्या काळात गावोगावी शासकीय नळपाणी योजनेचे पेव फुटले असल्यामुळे अवघ्या गावाची तहान भागविणाऱ्या विहिरी सद्य:स्थितीत दुर्लक्षित झाल्या आहेत. विहिरीतील गाळ काढून विहिरींची निगा राखण्याऐवजी विहिरींचा उपयोग कचराकुंडी सारखा केला जात असल्याने, चिरनेर गावातील ग्रामपंचायत मालकीच्या सर्वच विहिरींना कचराकुंडीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. विहिरींच्या काठावरील हंड्याची जागा उकिरडे, गवत, झाडे झुडपे व भंगार वस्तूंनी घेतली आहे.

साधारणतः २०-२२ वर्षांपूर्वी या सर्व विहिरी सुस्थितीत होत्या. चिरनेर गावातील नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी याच विहिरीतील पाण्याचा वापर करत असत. या भागातील तळी, नाले, सार्वजनिक पाणवठे, कोरडे होत असल्यामुळे घोटभर पाण्यासाठी महिलांना मैलोमैलची भटकंती करावी लागत असे.

चिरनेर-मुळपाडा येथे असलेली रहाट विहीर, पाणीटंचाईच्या काळात जनतेसाठी अमृतकुंभ ठरली होती. पाणीटंचाईच्या वणव्यात शासकीय नळ पाणी योजना महत्त्वाच्या ठरल्या असल्या, तरी

> **चिरनेर गावात जवळजवळ वीस-बावीस वर्षांपूर्वी नळपाणी योजना आली. तेव्हापासून एकेकाळी अमृतकुंभ ठरलेल्या या विहिरींकडे स्थानिक प्रशासनाबरोबर, येथील नागरिकांचे दुर्लक्ष झाले आहे. त्या विहिरींना आता कचरा कुंड्यांचे स्वरूप आले आहे. हे डोळ्याने न पाहाण्यासारखे आहे. संबंधित प्रशासनाने या गोष्टीची दखल घेऊन, विहिरींच्या काठावर साठविलेला भंगार काढून विहिरींची जागा स्वच्छ करावी. आणि, या अमृतकुंभांचे पावित्र्य राखावे.**
> **- नारायण गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते, चिरनेर**

येथील पूर्वापार ग्रामीण भागातील ग्रामस्थांची तहान भागवत असलेल्या विहिरींकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायला नको होते. या विहिरींची योग्य प्रकारे निगा राखली असती, तर पाणीही स्वच्छ राहिले असते. त्याचा वापर कपडे, धुणीभांडी व इतर कामासाठी करता आला असता. हे मात्र तितकेच खरे आहे.

## अंड्यातील सापाच्या पिल्लांना जीवदान

**उरण :** केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे उलवे नोड अध्यक्ष विकी देवेंद्र यांना उलवे शिवाजीनगर येथील सिडको उद्यानामध्ये असणाऱ्या दगडांच्या आतमध्ये सापांची अंडी निदर्शनास आली. या अवलिया वन्यजीवप्रेमी सर्पमित्राने ती सापाची मिळालेली एकूण ३० अंडी त्या दगडांमधून सुखरूप बाहेर काढून एका वाळूने भरलेल्या बंद डब्यामध्ये तब्बल २१ दिवस ठेवली. त्यानंतर त्या अंड्यांमधून एकूण २८ सापांची पिल्ले जन्माला आली. केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या नेतृत्वात ही संस्था काम करीत आहे. याची सर्व माहिती उरण वनविभाग वनपरीक्षेत्र अधिकारी कोकरे यांना कळविण्यात आली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या सर्व सापाच्या पिल्लांना निसर्गाच्या अधिवासात मुक्त संचार करण्यासाठी जंगलात सोडण्यात आले.

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर निविदा नोटीस

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभागात), पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन साफसफाई करणे या कामावर नियंत्रण ठेवणेकरिता ॲप तयार करणेकामी संस्थेची नेमणूक करणेकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ११/०७/२०२५ ते दि. १८/०७/२०२५ पर्यंत दुपारी ०५:०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची दरपत्रके दि १८/०७/२०२५ पर्यंत दुपारी ०५:०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

सही/-
**उपआयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

घनकचरा व्यवस्थापन विभागात,
पनवेल महानगरपालिका
जा.क्र पमपा/घकवि/२५२५/प्र.क्र.११२/४३७/२०२५
दि. ११/०७/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री.नामदेव गोमा ठाकुर आणि श्री.अमित नामदेव ठाकुर, यांनी मौजे तळवळी, ता.मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक कृष्णा राजाराम काटकर, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र.व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| तळवळी, ता.मुरूड जि.रायगड | ८ | वरकस ०-७३-०० पो.ख.०-२०-०० एकुण क्षेत्र ०-९३-०० | ०.७५ |

सदरहू वर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू.करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तकार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १०/०७/२०२५
मोबा. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
मु.वरसोली, बुरूमखाण
ता.अलिबाग, जि.रायगड

## नावात बदल

माझे पुर्वाश्रमीचे नाव कु.मेघा मनोहर पेटारे असे होते. विवाहानंतर त्यात बदल होऊन ते आता सौ.अनघा अमरेश कुडाळकर असे झाले आहे. (एक्झीक्युटीव्ह मॅझिस्ट्रेट अलिबाग यांचेसमोर केलेल्या अफिडेव्हीट क्र.२५५२०४१७७१२६८६००३९२१८०) (दिनांक : ११.०७.२०२५ नुसार)

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता.अलिबाग जि.रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.धर्मा दत्तु दळवी यांच्याकडून त्यांच्या सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजराहीत असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| मापगांव ता.अलिबाग | १९६ | ०-०१-०० | ०.०२ |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११/०७/२०२५

**ॲड. सुजित पां. पाटील**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठरोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.- ९८८१४४५३५२

## मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड
### दरपत्रक सुचना सन २०२५-२६
### जा.क्र.मुनप/दरपत्रक/७२५/२०२५-२६

मा.मुख्याधिकारी, मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि.रायगड यांचेकडून ''सन २०२५-२६ या वित्तीय वर्षा करिता न.प कार्यक्रमासाठी छायाचित्रण व व्हि.डी.ओ शुटींग करणे. तसेच सन २०२५-२६ या वित्तीय वर्षा करिता पाणीपुरवठा सफाई व शिपाई कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविणे बाबत. ''या कामाचे दरपत्रक मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, जि.रायगड येथे दिनांक १२/०७/२०२५ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक १८/०७/२०२५ पर्यंत आहे.

दिनांक : ०८/०७/२०२५

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

जा.क्र.न्यायशाखा/२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग
''कल्पतरू'' इमारत मुख्य पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड
दिनांक : ११/७/२५

## चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र.३६९/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** ''श्री स्वामी समर्थ मंडळ, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड'', मु.भानवज, पो.खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड, पिन क्र. ४१०२०३

**ट्रस्ट नोंदणी क्रमांक -** महा १२०/२००१ (रायगड), एफ ३७६३/२००१ (रायगड)

**अर्जदार**-श्री सुधीर शंकर तेंडूलकर

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्जा संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

१) स्थावर मिळकत (वर्णन)- मौजे. भानवज, ता. खालापूर, येथील मिळकत खालील मालमत्ता (जमिन मिळकत) न्यासाचे रेकॉर्डवर घेण्यात यावी

भूमापन क्रमांक व उपविभाग (सर्व्हे नं. हि. नं.) १/२ चा हि. नं. ५/५ सि. स. क्र. ५३६७ या बिनशेती झालेल्या एकुण किंमत- रुपये ८८५००/- मिळकती मधील प्लॉट क्र.१०ची ३५०० चौ.फूटाची म्हणजेच ३२५.२७८ चौ.मीटर

चतुः सिमा :
पुर्वेस : प्लॉट क्र.११ ची मिळकत
पश्चिमेस : प्लॉट अंतर्गत रस्ता
दक्षिणेस : डोंगर
उत्तरेस : प्लॉट अंतर्गत रस्ता

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर लेखी पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ११/०७/२०२५ रोजी दिली.

सही/-
**अधिक्षक (प्र.)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
### ई-निविदा आमंत्रण सूचना

प्रधान मुख्य अभियंता, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचेद्वारे खालील कार्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल बोली प्रणालीत खुली निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव: 2025-26 ते 2026-2027 या दोन वर्षांच्या कालावधीसाठी उप मुख्य अभियंता, मुख्यालय, कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड बेलापूर यांच्या अंतर्गत किरकोळ कामे, देखभाल, दुरुस्तीची कामे आणि कामगार साहित्याचा पुरवठा यासाठी वार्षिक देखभाल करार. निविदा सूचना क्रमांक : केआर-डब्ल्यू-09-2025-07. अंदाजित खर्च**: रु. 82,64,995/- जीएसटी वगळून. **शेवटची तारीख व वेळ**: 01.08.2025 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: चोवीस महिने (मान्सूनसह). मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. अधिक माहिती अथवा निविदेमध्ये सहभागासाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. शुद्धिपत्रक/परिशिष्ट फक्त या संकेतस्थळावरच प्रसिद्ध केले जातील.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे गोवे, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट | एकुण क्षेत्र नं | आकार हे आर | प्रकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| लक्ष्मी मोरेश्वर गुजर व इतर | २१८ | जिरायत ०-३३-०० | १=४६ | २ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा कबजा वहिवाट वचनचिठ्ठी, दावा. दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. १२/०७/२०२५

सही /
**ॲड. श्री.पी.जी.दाभाडे,**
रा.फ्लॅट नं.४०२, बी विंग, ४था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता.रोहा जि.रायगड ४०२१०९,
मोबा. क्र. ९२७२७९३९५६

## जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, मौजे चौल येथील गट क्रमांक ६४, एकूण क्षेत्र ०-३३-६० आर्स ही बागायत मिळकत आणि त्यावरील ग्रामपंचायत घर क्रमांक ५०३ आणि ५०४ अशा सर्व मिळकती आमचे अशिलांनी विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले असून, त्याबद्दल व्यवहाराची बोलणी चालू आहेत. सदर मिळकत निर्वेध असलेबद्दल आमचे अशीलांस या मिळकतींच्या विद्यमान मालकांनी हमी दिली आहे. सदर मिळकती संदर्भात/व्यवहारा संदर्भात कोणाची हरकत असल्यास, कोणाचा हक्क हितसंबंध असल्यास त्याबद्दल लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांचे मुदतीमध्ये आमचेकडे संपर्क साधावा. मुदतीत हरकती न आल्यास मुदत पूर्ण झाल्यानंतर आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कसलीही हरकत/तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांना कळावे.

तारीख : ११/०७/२०२५

**ॲड. संजय माधव आचार्य**
मु.पोस्ट चौल.
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीच्या विद्यमान मालक अर्चना मिलिंद म्हात्रे यांचेकडनू कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग | २१६३/१/२ | जिरायत ०-१६-४० पो.ख. ०-००-४० एकुण ०-१६-८० | २.२६ |
| नागाव, ता.अलिबाग, | २१६३/१/१ | जिरायत ०-३२-६० पो.ख. ०-००-८० एकुण ०-३३-४० | २.२६ |

वर नमुद भुमापन क्र. २१६३/१/२ हि संपुर्ण मिळकत आणि भुमापन क्र. २२६३/१/१ या मिळकती पैकी अर्चना मिलिंद म्हात्रे यांचे हिश्याचे ०-१८-३० हे. आर.क्षेत्र मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळ हक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहिवाट, कोटर्क चेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरुन सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १०/०७/२०२५
मोबा. ९९२२७९८५२८

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु.चिंचपा गल्ली, नागाव
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे मांडला ता.मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.निलेश गोविंद थळे, रा.१०६/अे विंग, गौरी वैकुंठ व्हीला को. ऑप.हौ.सोसा.सुभाष रोड, चिंचोलीपाडा, डोंबिवली-पश्चिम, ठाणे यांच्या नांवे असलेली भातशेती व घर मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मांडला ता.मुरुड | १९१/१/१ | ०-३३-४० पो.ख.०-०७-६० एकूण ०-४१-०० | ०.३४ |

वर नमूद मिळकतीपैकी विद्यमान मालक निलेश गोविंद थळे यांच्या मालकीहक्कात असलेली ०-१६-८० हे.आर., पो.ख. ०-०४-२० हे.आर., एकूण क्षेत्र ०-२१-०० हे.आर., आकार रु.०.१३ पैसे ही मिळकत व त्या मिळकतीमधील ग्रामपंचायत मांडला घर क्र.५१६ यासह.

सबब सदरहू भातशेती व घर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू भातशेती व घर मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०७/२०२५

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की आमचे अशिल सौ. संयोगिता हर्षल पाटील ह्या मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील ''आत्माराम नगर गृहनिर्माण संस्था मर्यादित'' चेंढरे-अलिबाग मधील इमारत क्र.१ मधील तळ मजल्यावरील फ्लॅट क्र.१ च्या विद्यमान मालकीण असून त्यांचेकडून दिनांक ०१/०६/२०२५ रोजी अलिबाग शहर येथे प्रवासा दरम्यान सदर फ्लॅटचे मूळ दस्तऐवज पैकी दिनांक २९/०५/१९९९ रोजी सौ.संजया उदय गोयजी व श्री. उदय हरिहर गोयजी आणि सौ.सुनीला मोहन पाटील यांचे मध्ये मा.दुय्यम निबंधक-अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र.अलज-८२२/१९९९ या क्रमांकाने नोंदविलेला ''खरेदीखत'' या शीर्षकाचा मूळ दस्त, पावती व सूची-२ च्या मूळ प्रतीसह गहाळ झालेला आहे व त्याचा आमचे अशिलांनी सगळीकडे शोध घेतला असता त्यांस तो मिळाला नाही आहे. सदरहू बाबतीत आमचे अशिलांनी अलिबाग पोलीस स्टेशन येथे दिनांक २०/०६/२०२५ रोजी लेखी तक्रार देखील नोंदविलेली आहे.

तरी सदरहू मूळ दस्त तसेच पावती व सूची-२ ची मूळ प्रत हि कुणाला आढळून आल्यास किंवा त्याबाबत काही माहिती असल्यास ती खालील पत्त्यावर आणून द्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/०७/२०२५

सही/-
**ॲड. समीर अरुण कोळगांवकर**
जोगळेकर ट्रान्सपोर्ट समोर,
जोगळेकर नाका, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड. ४०२२०१
मो. नं. ८९८३९२०८०८

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवंसा आमची अशिलांस विद्यमान मालक श्री.आनंद दत्ताराम बुरांडे यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| भोईघर, ता.मुरुड | ११७/३ | एकूण क्षेत्र ०.६५.०० पैकी ०.४०.०० | ०.४० |

वर नमुद केलेली मिळकत श्री. आनंद दत्ताराम बुरांडे यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे क्षेत्र ०.४०.०० आकार ००८.०० मिळकत खरेदी-विक्रीच्या बाबतीतला जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोत्क, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ११-०७-२०२५

सही /-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

दि.११/०७/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक सुनिता रघुनाथ कदम, श्री.दिपक रघुनाथ कदम, श्री.अनंत रघुनाथ कदम व संचिता संजय कदम यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| कावीर, ता.अलिबाग | १२१ | २-३५-९० | ४४.८६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी सुनिता रघुनाथ कदम, श्री. दिपक रघुनाथ कदम, श्री. अनंत रघुनाथ कदम व संचिता संजय कदम यांचे हिश्यातील एकूण क्षेत्र २-३५-९० हे. आर., आकार ४४.८६ रू.पै. या मिळकतीपैकी ०-१५-०५ हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. प्रियांका किशोर बिर्जे**
रा.मु.कुरुळ,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ८३७९९३७८७०

## लॉर्ड्स टेस्ट पहिला दिवस

# इंग्लंडच्या बॅझबॉलचा भारताने वाजवला बँड

### ■ जो रूट ९९, स्टोक्स नाबाद ३९; नितीश रेड्डीचे २ बळी

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

**इंग्लंडचा क्रिकेट संघ कायम वेगाने धावा करण्यास पसंती देतो. भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील तिसऱ्या क्रिकेट कसोटीत टिच्चून मारा केला आणि त्यांनी धावगतीस वेसण घातली. त्यामुळे भारताच्या गोलंदाजांनी इंग्लंडच्या फलंदाजांना चांगलेच वठणीवर आणले. कारण जो रुटचा अपवाद वगळता एकाही इंग्लंडच्या खेळाडूला आपली छाप पाडता आली नाही. त्यामुळे पहिल्या दिवसावर भारताचाच वरष्मा राहिल्याचे पाहायला मिळाले. जो रूटच्या नाबाद ९९ धावांच्या जोरावर इंग्लंडने पहिल्या दिवशी ४ बाद २५१अशी मजल मारली आहे.**



इंग्लंडने लॉर्ड्स कसोटीत सुरुवातीस तरी आपले बॅझबॉल धोरण बाजूला ठेवले. नितिश कुमार रेड्डीने एकाच षटकांत दोघांना बाद केले, पण त्यापूर्वीपासूनच इंग्लंडने खेळपट्टीस उभे राहण्यास आपली पसंती असल्याचे दाखवले होते. झॅक क्रॉली आणि बेन डकेटने पहिल्या विकेटसाठी ४३ धावांच्या भागीदारीस ८२ चेंडू घेतले, तर ऑली पोप आणि जो रुट यांची तिसऱ्या विकेटची भागीदारी २११ चेंडूंची होती. त्यात १०९ धावाच झाल्या. त्यावरून इंग्लंडच्या फलंदाजांचा बचावात्मक पवित्रा लक्षात येतो. मोहम्मद सिराजने आम्हाला बॅझबॉल बघायचे आहे, अशी शेरेबाजी रुटला उद्देशून केली. त्यानंतरही इंग्लंड शांत होते.

बॅझबॉलमध्ये इंग्लंड कायम धावांच्या पाठलागास पसंती देते. मात्र बेन स्टोक्स-ब्रेंडन मॅकलम यांच्याकडे संघाची धुरा आल्यापासून इंग्लंडने केवळ दुसऱ्यांदा प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. घरच्या मैदानावर खेळणारे इंग्लंड आक्रमक सुरुवात करतील अशी अपेक्षा होती. मात्र जसप्रीत बुमराह, आकाश दीप आणि मोहम्मद सिराजने माऱ्यात अचुकता राखत इंग्लंडच्या फलंदाजांना सतावले, पण त्यांना विकेटपासून वंचित रहावे लागले. चेंडूचा टप्पा काहीसा उजव्या यष्टीच्या काहीसा बाहेर ठेवत इंग्लंडच्या फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडण्याची भारताची योजना अमलात आली नाही. इंग्लंडच्या फलंदाजांनी हे चेंडू सोडून देण्यासच पसंती दिली.

लॉर्ड्स मैदानावरील उताराशी जुळवून घेण्यासाठी भारतीय गोलंदाजांना वेळ लागला. बुमराहने मैदानाच्या दोन्ही एंडकडून गोलंदाजी केली. आकाश दीपला दुसऱ्या बाजूने गोलंदाजी देण्याऐवजी शुभमन गिलने नितिश रेड्डीकडे चेंडू सोपवला.तिसऱ्या सत्राच्या पहिल्याच षटकात रवींद्र जडेजाच्या गोलंदाजीवर पोप झेलबाद झाला. पाचव्या क्रमांकावर आलेला हॅरी ब्रूकही जास्त काळ टिकू शकला नाही. त्याला जसप्रीत बुमराहने त्रिफळाचित केले, ब्रूकने ११ धावा केल्या. संघाने १७२ धावांवर ४ विकेट गमावल्या.

सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कर्णधार बेन स्टोक्सने जो रूटसह संघाची धुरा सांभाळली. रूटने ४५ धावा काढताच भारताविरुद्ध ३ हजार कसोटी धावा पूर्ण केल्या. त्याने आपला ६७ वा कसोटी अर्धशतक ठोकला आणि संघाचा स्कोअर २०० धावांच्या पुढे नेला. रूटने स्टोक्ससह दिवसाचा खेळ संपेपर्यंत आणखी एकही विकेट पडू दिली नाही. रूट ९९ धावा काढल्यानंतर नाबाद परतला आणि स्टोक्स ३९ धावा काढल्यानंतर नाबाद परतला.

भारताच्या प्रमुख गोलंदाजांनी रोखून धरलेल्या डकेट आक्रमणास उत्सुक होता. त्याने नितिशचा उसळता चेंडू फटकावण्याचा प्रयत्न केला, पण पंतने झेल टिपला. पुढच्याच चेंडूवर पोपचा झेल गिल गलीत टिपू शकला नाही. त्यावेळी बाहेर जाणाऱ्या चेंडूवर पोप चकला होता. याच षटकातील अखेरच्या चेंडूवर नितिशने क्रॉलीला चकवले. यष्टींच्या रेषेत पडलेला चेंडू क्रॉलीच्या बॅटला चाटून पंतच्या ग्लोव्हजमध्ये स्थिरावला.

या कसोटीने पुन्हा चाहते पाच दिवसांच्या खेळाचे चाहते असल्याचे दिसले. लॉर्ड्स परिसरातील रस्ते स्टेडियमकडे येणाऱ्या चाहत्यांच्या गर्दीने फुलून गेले होते. विशेषतः सेंट जॉन्स वूड मेट्रो स्थानकापासून स्टेडियमकडे येणाऱ्या रस्त्यावर गर्दी होती. त्यात भारतीय वंशाचे जास्त होते. बेंगळुरूहून आलेल्या एका कुटुंबाने तीन तिकिटांसाठी १२०० पौंड मोजले.

## निवडक

### मुल्डरच्या निर्णयावर लारांचा संताप

**बुलावायो** : दक्षिण आफ्रिकेचा ऑलराउंडर वियान मुल्डर सध्या क्रिकेटविश्वात चर्चेचा केंद्रबिंदू ठरतोय. यामागचं कारण म्हणजे त्याने ब्रायन लारा यांच्या सन्मानार्थ घेतलेला एक मोठा निर्णय. जेव्हा त्याच्याकडे लाराच्या कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा (४००) विक्रम मोडण्याची संधी होती, मात्र त्याने ती केली नाही. झिम्बाब्वेविरुद्ध बुलावायोमध्ये झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात मुल्डरने भेदक फलंदाजी करत ३६७ धावा केल्या आणि नाबाद राहून स्वतःच दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव घोषित केला. विशेष म्हणजे तो स्वतःच संघाचा कर्णधार होता आणि सामना जिंकण्यासाठी भरपूर वेळ शिल्लक होता. त्यामुळे त्याच्या निर्णयावर चर्चेला उधाण आलं, काहींनी त्याच्या निर्णयाचं कौतुक केलं, तर काहींनी त्याचं विक्रम न मोडण्यावर नाराजी व्यक्त केली. सुपरस्पोर्टला दिलेल्या मुलाख-तीत वियान मुल्डरने खुलासा केला की, ब्रायन लाराशी याबाबत त्याची खास चर्चा झाली होती. मुल्डर म्हणाला, लारांनी मला सांगितलं की मी माझा स्वतःचा वारसा घडवतो आहे आणि मला तो विक्रम मोडायला हवा होता. ते म्हणाले, विक्रम मोडण्यासाठीच असतात आणि पुढच्या वेळी अशी संधी मिळाली तर त्यांना मागे टाकावं अशी त्यांची इच्छा आहे. मुल्डरने पुढे असंही म्हटलं की, खेळाचा आदर करणं त्याच्यासाठी महत्त्वाचं आहे आणि जर पुन्हा अशीच वेळ आली, तरीही तो तेच करेल. मात्र या निर्णयावर सर्वांची एकमताने प्रतिक्रिया नव्हती. दक्षिण आफ्रिकेचा फिरकीपटू तबरेज शम्सीने यावर नाराजी व्यक्त केली, तर ख्रिस गेलसारख्या दिग्गज फलंदाजाने मुल्डरने विक्रम न मोडल्याचं मोठी चूक म्हटलं आहे.

### पात्रतेपासून इटली एक विजय दूर

**इटली** : २०२६ च्या टी विश्वचषकासाठी पात्रता फेरी गाठण्यापासून इटली फक्त एक विजय दूर आहे. आयसीसी पुरुष टी विश्वचषक युरोप प्रादेशिक अंतिम सामन्यात इटलीने स्कॉटलंडचा १२ धावांनी पराभव केला.२०२६ चा टी विश्वचषक भारत आणि श्रीलंका येथे खेळला जाईल. यजमान भारत आणि श्रीलंका व्यतिरिक्त, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, वेस्ट इंडिज, आयर्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि कॅनडा आधीच पोहोचले आहेत. या स्पर्धेत २० संघ सहभागी होतील, त्यामुळे ७ संघांसाठी जागा रिक्त आहेत.जर नेदरलँड्स विरुद्ध जिंकले, तर थेट प्रवेश मिळेल. इटली आता पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे आणि जर त्यांनी शुक्रवारी (११ जून) नेदरलँड्सविरुद्धचा शेवटचा सामना जिंकला, तर त्यांचे विश्वचषकातील स्थान निश्चित होईल. जरी त्यांनी हा सामना जवळपास गमावला आणि जर्सी किंवा स्कॉटलंडने त्यांचा सामना मोठ्या फरकाने जिंकला नाही, तरीही इटली पात्र ठरेल. इटलीचा पुढचा सामना नेदरलँड्सविरुद्ध असेल. माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू कर्णधार इटलीचे नेतृत्व जो बर्न्सकडे आहे. त्याने इटलीपूर्वी ऑस्ट्रेलियासाठी २३ कसोटी सामने खेळले आहेत.

# मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कूल गोल्डन स्कूल अ‍ॅवॉर्डने सन्मानित

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड एज्युकेशन अँड ट्रस्ट संचालित युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा या शाळेने इंडियन टॅलेंट ऑलिंपियाडमध्ये विशेष चमक दाखविल्याने या शाळेला राष्ट्रीय स्तरावर गोल्डन स्कुल अवॉर्डने इंडियन टॅलेंट ऑलिंपियाडचे संचालक मधुमती एम व ऑलिम्पियन चॅम्पियन पी.टी.उषा यांच्या सहीनिशी सन्मानपत्र व आकर्षक समानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



युनायटेड इंग्लिश स्कूल मोर्बा या शाळेने इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड २०२४ - २५ या वर्षामध्ये विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट सहभाग दिला. यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका झोया बडे यांना त्यांच्या अपवादात्मक शैक्षणिक कामगिरीसाठी व उत्कृष्ठ योगदानाबद्दल इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड हा सर्वोत्कृष्ठ प्रिन्सिपल पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच या शाळेतील दोन प्रतिभावान विद्यार्थी आफिया टाके व अदीब गालसुलकर यांना २०२४ - २५ मध्ये झालेल्या इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी सरकारी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. युनायटेड इंग्लिश स्कूल मोर्बा शाळेच्या या यशामुळे शाळेची शैक्षणिक उत्कृष्टतेची आणि युवा प्रतिभेचे संगोपन करण्याची बांधिलकी दिसून येत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर या शाळेने अधिकतम लक्ष केंद्रित केले आहे. या शाळेने गोल्डन स्कुल अवॉर्ड प्राप्त केल्याने शाळेचे पुरस्काराने सन्मानित मुख्याध्यापक व शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव देशपातळीवर झळकावून अभिमानास्पद कामगिरी करून पुढील यशासाठी आपली तयारी सुरु केली आहे. या शाळेला गोल्डन स्कुल अवॉर्डने सन्मानित करण्यात आल्याने अध्यक्ष राहील गंगरेकर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कॅम्फरच्या सलग ५ चेंडूत ५ विकेट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कर्टिस कॅम्फर हा व्यावसायिक क्रिकेटमध्ये सलग पाच चेंडूत पाच विकेट्स घेणारा पहिला खेळाडू ठरला आहे. कॅम्फरने इंटर-प्रोव्हिन्शियल टी-२० ट्रॉफीमध्ये नॉर्थ-वेस्ट वॉरियर्स विरुद्ध मुन्स्टर रेड्सकडून



खेळताना ही कामगिरी केली. कॅम्फरने त्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या षटकात हे पाच बळी घेतले. १२ व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर जारेड विल्सन बोल्ड झाला. पुढच्याच चेंडूवर ग्रॅहम ह्यूमला एलबीडब्ल्यू केले. १४ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर अँडी मॅकब्राइन झेलबाद झाला.

# अमेरिकेची अनिसिमोवा विम्बल्डनच्या अंतिम फेरीत

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

महिला टेनिस एकेरीत, नंबर-१ वर असलेल्या बेलारूसी अरिना सबालेन्काला विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला. तिला अमेरिकेच्या अमांडा अनिसिमोवाकडून ३ सेटच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा



लागला. दुसऱ्या उपांत्य फेरीत, जागतिक क्रमवारीत ८ व्या क्रमांकावर असलेल्या पोलंडच्या इगा स्वीटेकने बाजी मारली. १२ जुलै रोजी अंतिम फेरीत तिचा सामना अनिसिमोवाशी होईल.

स्विटेकने सरळ सेटमध्ये विजय मिळवला. महिला एकेरीच्या पहिल्या उपांत्य सामन्यात, अनिसिमोवाने पहिल्या सेटमध्ये सबालेन्काचा ६-४ असा पराभव केला. सबालेन्काने पुनरागमन केले आणि दुसरा सेट ६-४ च्या फरकाने जिंकला.

त्यानंतर अनिसिमोवाने पुनरागमन केले आणि तिसरा सेट ६-४ असा जिंकून सामना जिंकला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात, स्वीटेकने स्वित्झर्लंडच्या बेलिंडा बेन्सिकचा ६-२, ६-० च्या सरळ सेटमध्ये पराभव केला. विम्बल्डनच्या अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर अमेरिकेच्या अमांडा अमिनिसोवाला स्वतःवर विश्वासच बसत नव्हता.

# स्वर थळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण नगरपरिषद शाळा क्र. ७, महाडिकवाडी येथील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी स्वर विश्वनाथ थळे याने शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळवत शाळेचे नाव उज्वल केले आहे.


स्वरने उत्कृष्ट गुण मिळवत आपल्या बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती आणि चिकाटीचा प्रत्यय दिला. त्याच्या या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता पाटील यांचे मार्गदर्शन, वर्ग शिक्षक प्रमोद रमेश भावसार यांचे अभ्यासामधील योगदान आणि पालकांचा सततचा पाठिंबा कारणीभूत आहे.

या यशाबद्दल शाळेत स्वरचा सत्कार करण्यात आला असून, शाळेच्या इतर विद्यार्थ्यांसाठीही हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. शाळेतील शिक्षकवृंद अंजना म्हात्रे, मिनाक्षी पिंगळे आणि पालकांनी स्वरचे अभिनंदन केले असून, त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जेएसएममध्ये विधी साक्षरता शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अ‍ॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेज, जेएसएम कॉलेज आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड अलिबाग, सचिव तेजस्विनी निराळे, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश यांनी लोकसंख्या दिनाचे औचित्य साधत मार्गदर्शन करताना युवांनी सामाजिक आणि राष्ट्रीय प्रगतीमध्ये सहभागी होण्यासाठी वैयक्तिक सुधारणा करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

बालविवाह आणि लोकसंख्या वाढ टाळण्यासाठी युवांनी स्वतःच्या जाणीवा आणि संवेदनशीलता वृद्धिंगत करण्याची गरज आहे असे आवाहन केले.

कायदेशीर मदत आणि बचाव सल्लागार प्रणालीचे प्रमुख अ‍ॅड. चंद्रशेखर कामथे यांनी लोकसंख्या दिन या विषयावर मार्गदर्शन करताना युवांनी सार्वजनिक भान ठेवत, समाज माध्यमांचा वापर कसा करावा याबाबत माहिती दिली. लोकसंख्येची वाढ होत असतानाच बालकांविषयीच्या समस्या कशा गंभीर होत चालल्या आहेत. याविषयी विश्लेषण केले.

कायदेशीर मदत आणि बचाव सल्लागार प्रणालीच्या उप प्रमुख अ‍ॅड. मनिषा नागावकर यांनी बालविवाहामुळे समाजात स्त्री आणि जन्माला येणारे मूल यांच्या आरोग्याविषयक समस्या तसेच बालविवाह प्रतिबंध कायदा यामधील तरतूदींविषयी सविस्तर स्पष्टीकरण दिले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबागमधील सहाय्यक प्रा.देवोदत्त सूर्यवंशी यांनी लोकसंख्येचा विस्फोट, स्थलांतरामुळे मोठ्या शहरातील नैसर्गिक स्त्रोतांवर येणारा ताण, पर्यावरणाची होणारी हानी या विषयावर सखोल माहिती दिली.

लोकसंख्येविषयी चर्चा करताना त्यांनी महिला सक्षमिकरणाचे महत्व विशद केले. स्त्रियांचे शिक्षण आणि स्वातंत्र्य हे लोकसंख्येच्या विस्फोटापासून जगाला वाचवू शकते असे प्रतिपादन त्यांनी केले.

लॉ कॉलेजचे प्रा. डॉ. संदिप घाडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. जे. एस. एम. महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. पी. बी. गायकवाड यांनी आभार व्यक्त केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● ३००० चौ. फूट तिसरा मजला कमर्शिअल वापरासाठी भाड्याने देणे आहे. Contact- 9226379844

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा.

● नारळ पाहिजेत - आमच्याकडे नारळ विकत घेतले जातील. निर्वा इंटरप्रायझेस, आक्षी, अलिबाग मो नं. ९३७१२६३०३१/ ९७६३२५३०३१

● हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८

● पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.

● अलिबाग स्टॅंडजवळ 1BHK ब्लॉक भाड्याने देणे आहे, ९१६८०२८५१७, हॉस्पिटलला मावशी व वॉर्डबॉय पाहिजे आहेत.

● रानवडे हॉस्पिटलला पुरूष सफाई कामगार हवेत. उत्तम पगार. संपर्क : ९७६४९९५७२८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### लढत रोमहर्षक होण्याची दाट शक्यता | यानिकला अंतिम फेरीत पोहोचण्याची संधी

# जोकोविचसमोर सिनरचे आव्हान

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन ग्रँडस्लॅम या प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेमध्ये उद्या शुक्रवारी (ता. ११) होत असलेल्या पुरुष एकेरीतील उपांत्य फेरीच्या लढतीत मानांकित खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. सहाव्या मानांकित नोवाक जोकोविचसमोर अव्वल मानांकित यानिक सिनरचे आव्हान असणार आहे. दुसरा मानांकित कार्लोस अल्काराझ पाचवा मानांकित टेलर फ्रिट्झ याचा सामना करील. दोन्ही उपांत्य फेरीच्या लढती रोमहर्षक होण्याची दाट शक्यता आहे.

यंदा विम्बल्डन टेनिस स्पर्धेला नवा विजेता मिळणार की माजी विजेताच झळाळता करंडक पटकावणार, या प्रश्नाचे उत्तर लवकरच मिळेल.



नोवाक जोकोविच याने २४ ग्रँडस्लॅम जेतेपदांना गवसणी घातली आहे. त्याने २०२३मध्ये अमेरिकन ओपन ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले होते. यानंतर मात्र त्याला ग्रँडस्लॅम अजिंक्यपदाला गवसणी घालता आलेली नाही.

जोकोविच याने सात वेळा विम्बल्डन ग्रँडस्लॅम जेतेपदावर नाव कोरले आहे. कारकीर्दीतील २५व्या अन् विम्बल्डनमधील आठव्या ग्रँडस्लॅम विजेतेपदासाठी जोकोविच सर्वस्व पणाला लावताना दिसणार आहे. नोवाक जोकोविचसमोर यानिक सिनरचा अडथळा असणार आहे.

यानिक सिनर आतापर्यंत दोन ऑस्ट्रेलियन ओपन व एक अमेरिकन ओपन ग्रँडस्लॅम विजेतेपदाची माळ आपल्या गळ्यात घातली आहे. हार्ड कोर्टवर त्याने घवघवीत यश संपादन केले आहे. फ्रेंच ओपन व विम्बल्डन या दोन ग्रँडस्लॅममध्ये त्याला अद्याप मोठा ठसा उमटवता आलेला नाही.

जोकोविच-सिनर यांच्यामधील उपांत्य झुंजीत दोन्ही खेळाडूंचा कस लागेल, हे निश्चित आहे. नोवाक जोकोविच याने दहा वेळा विम्बल्डन ग्रँडस्लॅमची अंतिम फेरी गाठली आहे. त्यापैकी सात वेळा त्याने या स्पर्धेच्या अजिंक्यपदावर हक्क सांगितला आहे. आता तो अकराव्यांदा अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करेल. यानिक सिनर याला अद्याप एकदाही विम्बल्डन ग्रँडस्लॅमच्या अंतिम फेरीत पोहोचता आलेले नाही. जोकोविचला पराभूत करून तो अंतिम फेरीत पोहोचणार का, या प्रश्नाचे उत्तर जाणण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## पावसाळ्यात सफारी बंद का?

यावा पुढील महिन्यामध्ये तुमच्या घरातील मोठी माणसे वन्यजीव सफारीची योजना आखली असतील त्यांना थांबवा बरे कारण यावेळी काही राष्ट्रीय उद्याने बंद असतात. मित्रांनो, आपल्याकडील जिम कॉर्बेट, रणथंभोर, बांधवगड यासारखी मोठी राष्ट्रीय उद्याने पावसाळ्यात बंद असतात. पण यामागील कारण काय असते, माहिती आहे का तुम्हाला? चला तर, आज जाणून घेऊ या.

छोट्या दोस्तांनो, पावसाळा हा जंगलासाठी नवीन जीवनाची सुरुवात करण्याचा काळ असतो. या ऋतूमध्ये वाघ, बिबट्या, हत्ती आणि अनेक पक्ष्यांसह अनेक प्राण्यांचा प्रजनन हंगाम सुरू होतो. पावसामुळे जंगलात गवत आणि वनस्पती चांगल्या प्रकारे वाढतात. त्यामुळे नवजात पिल्लांसाठी सुरक्षित आणि पौष्टिक वातावरण तयार होते. अशा वेळी, मनुष्यप्राण्यांच्या हालचाली वन्य प्राण्यांच्या दिनक्रमांमध्ये व्यत्यय आणू शकतात. म्हणूनच उद्यान प्रशासन पावसाळ्यात उद्यान बंद ठेवते. यायोगे प्राणी कोणत्याही त्रासाशिवाय त्यांचे नैसर्गिक चक्र पूर्ण करू शकतील.



पावसाळ्यात जंगल सफारी बंद ठेवण्याचा आणखी एक फायदा प्रशासनाला होतो. म्हणजेच ते या वेळेचा वापर उद्यानाच्या पायाभूत सुविधांची दुरुस्ती आणि सुधारणा करण्यासाठी करतात. बऱ्याचदा रस्ते,

**माहिती असावे...**

साइनबोर्ड, वॉच टॉवर किंवा कॅम्प एरिया खराब झालेला असतो. तेव्हा पावसाळ्यातील या सुट्टीच्या काळात त्याची दुरुस्ती केली जाते. म्हणूनच येणाऱ्या पर्यटन हंगामात उद्यान पर्यटकांसमोर चांगल्या स्थितीत येते.

आणखी एक बाब म्हणजे पावसाळ्यात जंगलातील रस्ते निसरडे होतात, मार्ग अस्पष्ट असतात आणि मुसळधार पावसामुळे भूस्खलन किंवा अचानक पूर येण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत, जंगल सफारी केवळ कठीणच नाही तर आपल्यासारख्या पर्यटकांसाठी धोकादायक देखील ठरू शकते. म्हणून या हंगामात उद्यान बंद करणे गरजेचे असते.

ऑक्टोबरनंतर पाऊस थांबताच वनक्षेत्र पर्यटकांसाठी पुन्हा खुली होतात. देशातील जवळजवळ सर्व राष्ट्रीय उद्याने आणि व्याघ्र प्रकल्प पुन्हा एकदा पर्यटकांचे स्वागत होतात. पावसाळ्यानंतर वाढलेली हिरवळ आणि वन्यजीवांचे जीवनचक्र आपल्या जंगल सफारीचा अनुभव आणखी खास बनवतात.

## रबराच्या पट्ट्यांचे काम काय?




छोट्या मित्रांनो, तुम्ही रस्त्यांवर धावणारे मोठे ट्रक पाहात असाल. पण या ट्रकच्या टायरजवळ काळ्या रबराच्या पट्ट्या किंवा ट्यूबचे तुकडे का लटकलेले असतात, हा प्रश्न कधी तुमच्या मनात आला आहे का? आपल्यापैकी बहुतेक जण त्याकडे फक्त 'सजावट' किंवा 'जुन्या वस्तूंचा वापर' समजून दुर्लक्ष करतात, परंतु यामागे एक अतिशय व्यावहारिक आणि मनोरंजक कारण लपलेले आहे. चला, कोणते ते जाणून घेऊ या.

**वाचा तर खरं**

मुलांनो, रबराचे तुकडे ट्रकला वाईट नजरेपासून वाचवण्यासाठी ठेवलेले नसतात तर रबराच्या पट्ट्यांचे मुख्य काम ट्रकचे टायर स्वच्छ करणे हे असते. एखादा ट्रक रस्त्यावर, विशेषतः धुळीने किंवा चिखलाने भरलेल्या रस्त्यांवर धावतो तेव्हा टायरवर धूळ, चिखल, रेती आणि लहान दगड जमा होतात. ही घाण तशीच राहिली तर टायरची पकड कमी होऊ शकते शिवाय ते लवकर खराब देखील होऊ शकतात.

असे असताना टायर्सजवळ लटकणारे रबर स्ट्रिप्स एका साध्या पण प्रभावी तत्त्वावर काम करतात. ट्रक हलतो तेव्हा हवेच्या दाबामुळे आणि ट्रकच्या हालचालीमुळे रबर स्ट्रिप्सही सतत हलत राहतात. वेगात असताना स्ट्रिप्स वारंवार ट्रकच्या टायर्सवर आदळतात. या टकरीमुळे टायर्सवर साचलेली धूळ, माती आणि घाण सतत खाली पडत राहते. थोडक्यात हा एक प्रकारचा हलणारा टायर क्लीनरच असतो. या छोट्याशा गोष्टीमुळे ड्रायव्हरला टायर्स साफ करण्यासाठी वेळोवेळी थांबण्याची गरज राहत नाही.



## ऑलिंपियाडबद्दल महत्त्वाचे काही...

मुलांनो, तुम्ही ऑलिंपियाडबद्दल ऐकलं असेल. गणितामध्ये कारकिर्द घडवू इच्छिणारे विद्यार्थी गणिताची ऑलिंपियाड देऊ शकतात. ऑलिंपियाड ही अत्यंत आव्हानात्मक आणि कठीण परीक्षा असते. मुलांची क्षमता जाणून घेण्यासाठी विविध संस्था ऑलिंपियाड परीक्षांचं आयोजन करतात. ऑलिंपियाड स्पर्धेत सहभागी होणं ही विद्यार्थ्यांसाठी अभिमानास्पद बाब ठरते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध होतं. गणितातला कल जाणून घेण्याच्या दृष्टीने 'द इंडियन नॅशनल मॅथेमेटिकल ऑलिंपियाड' ही अत्यंत महत्त्वाची

**नॉलेज**

स्पर्धा समजली जाते. 'होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन' आणि भारत सरकारच्या अणू ऊर्जा विभागाच्या 'नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमेटिक्स' यांच्या संयुक्त विद्यमाने देशात ऑलिंपियाड कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. या माध्यमातून भारतीय विद्यार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या ऑलिंपियाड स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतात.

या परीक्षेचं आयोजन जानेवारीच्या तिसऱ्या किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या रविवारी केलं जातं. या परीक्षेचा कालावधी चार तासांचा असतो. या परीक्षेसाठी गणिताशी संबंधित वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करावा लागतो. ऑलिंपियाडच्या पुढच्या टप्प्यांमध्ये कठीण प्रश्न विचारले जातात. त्यामुळे गणितात हुशार असणारी मुलं ही परीक्षा देऊ शकतात.

## या शाखा महत्त्वाच्या

छोट्यांनो, तुम्ही सीआयडी आणि सीबीआयबद्दल ऐकलं असेल. मुलांनो, या दोन्ही तपास यंत्रणा आहेत. एखाद्या गुन्ह्याची उकल करण्याची जबाबदारी तपास यंत्रणांवर सोपवली जाते. या दोन्ही तपास यंत्रणांचं काम सारखंच असतं. मग या दोहोंमधला नेमका फरक तरी काय? जाणून घेऊ.

सीआयडी म्हणजे 'क्राईम इन्व्हेस्टिगेशकन डिपार्टमेंट'.




ही तपास यंत्रणा राज्य सरकारच्या अखत्यारित असते. म्हणजे सीआयडी राज्य सरकारच्या

**कोण होणार?**

आदेशाचं पालन करते. या तपास यंत्रणेला हत्या, दंगल, अपहरण चोरी यांसारख्या गुन्ह्यांच्या तपासाची जबाबदारी सोपवली जाते. ब्रिटिशांनी १९०२ मध्ये सीआयडीची स्थापना केली. ही संस्था राज्यपातळीवर काम करते. सीबीआय म्हणजे 'सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन'. सीबीआय ही भारत सरकारची प्रमुख तपास यंत्रणा आहे. सीबीआय विविध गुन्हे तसंच देशाच्या सुरक्षेशी संबंधित विविध घटनांच्या तपासाचं काम करते.

## काम झालं सोपं

मित्रमैत्रिणींनो, आता लॅपटॉपवर काम करत असताना फोन करण्यासाठी स्मार्टफोन हातात घ्यावा लागणार नाही. कारण तुम्ही लॅपटॉपवरूनच फोन करू शकाल. मायक्रोसॉफ्टचे 'विंडोज १०' युजर्ससाठी हे शक्य आहे. या फीचरमुळे कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून फोन करणं अगदीच शक्य आहे. चला तर मग, या फीचरची माहिती घेऊ या.

* मायक्रोसॉफ्टने 'विंडोज १० इनसायडर प्रिव्ह्यू बिल्ड १८९९९' चं अपडेट केल्यामुळे विंडोज १० वापरणाऱ्यांना लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवरूनही फोन करता येत आहे.



**टेक्नो टिप्स**

* या फीचरचा वापर करण्यासाठी तुम्हाला फोनमध्ये 'युवर फोन ॲप' डाउनलोड करावं लागेल. हे ॲप मायक्रोसॉफ्टनेच तयार केलं असून अँड्रॉइड ७.० आणि त्यापुढच्या व्हर्जन्सवर ते डाउनलोड करता येईल.

* या अपडेटनंतर डेस्कटॉपमध्ये डायलर आणि कॉन्टॅक्ट्सचे ऑप्शन्स दिसतील. कॉलिंग करण्यासोबतच कॉलिंग हिस्ट्रीही कॉम्प्युटरवर बघता येईल. कॉल नाकारला म्हणजे रिजेक्ट केला तर संदेश पाठवण्याचा पर्यायही डेस्कटॉपवर दिसेल.

* या अपडेटमुळे स्मार्टफोन सतत तपासावा लागणार नाही. डेस्कटॉपवरच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुम्ही आरामात बोलू शकाल.

## रेनकोट करा स्वच्छ

पावसाळ्यात रेनकोट वारंवार वापरावा लागतो. पण त्याची योग्य स्वच्छता करावी लागते. अन्यथा आजारी पडण्याचा धोका असतो. तेव्हा आज रेनकोट योग्यरित्या कसे स्वच्छ करावा हे पाहू या.

घातल्यानंतर प्रत्येक वेळी रेनकोट स्वच्छ करण्याची आवश्यकता नाही. तो साधारणपणे महिन्यातून एकदा किंवा १०-१५ वेळा घातल्यानंतर व्यवस्थित धुवावा. एरवी ओल्या कापडाने आणि साबणाच्या पाण्याने किरकोळ डाग काढून टाकता येतात.

रेनकोट स्वच्छ करण्यासाठी कधीही ब्लीच, फॅब्रिक सॉफनर, किंवा इतर कपडे धुण्याचे पदार्थ असणारा डिटर्जंट वापरू नका कारण हे घटक रेनकोटच्या वॉटरप्रूफ घटकांना नुकसान पोहोचवू शकतात.




रेनकोटवरील बहुतेक डाग सामान्यतः चिखलाचे असतात. तुम्ही संपूर्ण रेनकोट न धुताही ते काढू शकता. त्यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घ्या आणि त्यात एक ते दोन थेंब डिटर्जंट किंवा डिशवॉश (विम, प्रिल, इ.) घाला. साबण तयार होईपर्यंत पाणी ढवळा. आता या पाण्यात स्पंज किंवा मायक्रोफायबर टॉवेल बुडवा आणि टॉवेलने मातीचा डाग पुसून टाका. आता दुसरे स्वच्छ कापड किंवा

**करुन पाहा**

स्पंज स्वच्छ पाण्यात भिजवा. साबणाचे अवशेष काढून टाकण्यासाठी या ओल्या कापडाने डाग पडलेला भाग पुसून टाका. आता रेनकोट स्वच्छ, धूळमुक्त ठिकाणी हॅन्गरवर लटकवा आणि तो सुकू द्या. काही वेळातच रेनकोटवरील सगळे डाग गेलेले दिसतील. तेव्हा हा उपाय नक्की करुन बघा.





**ठिपके जुळवा**



## मिनेस्ट्रोन सूपचा प्रवास

छोट्या दोस्तांनो, जेवायला बाहेर गेल्यानंतर सूप ऑर्डर करताना तुम्ही मिनेस्ट्रोन सूप मागवत असाल. अनेकांना ते आवडते. चला तर, आज याचा इतिहासही जाणून घेऊ या.

मुलांनो, दुसऱ्या शतकात रोमने इटली जिंकली तेव्हा आर्थिक प्रगती झाली आणि व्यापाराचे नवे मार्ग खुले झाले. यामुळे रोमच्या राजधानीत अनेक प्रकारची कृषी उत्पादने येऊ लागली आणि रोमन पदार्थांमध्ये विविध प्रकारच्या भाज्यांचा वापर होऊ लागला. रोमन स्वयंपाकघराशी संबंधित 'दे रे कोसिनारिया' या पुस्तकात 'पोलस' नावाच्या सूपचा उल्लेख आहे. हे सूप फारो (एक प्रकारचे धान्य), चणे, बीन्स, कांदा, लसूण, चरबी आणि हिरव्या भाज्यांपासून बनवले जात असे. तेच मिनेस्ट्रोन सूपचे सुरुवातीचे रूप होते. अर्थात सुरुवातीला त्याला फारसे महत्त्व नव्हते. घरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या भाज्या आणि धान्यांचे मिश्रण करून हे



**गप्पांगण**


सूप बनवले जात असे. त्यात सहसा उरलेल्या भाज्या, पास्ता, तांदूळ, बीन्स आणि कधीकधी थोडे मांस असायचे. त्याचा मुख्य उद्देश पोट भरणे आणि पोषण देणे हा होता, कारण त्यावेळी अन्न वाया घालवणे हे पाप मानले जात असे.

मुलांनो, तेव्हा हे फक्त सूप नव्हते तर इटालियन कुटुंबांसाठी एक महत्त्वाचे अन्न होते. ते मोठ्या भांड्यांमध्ये तासनतास शिजवले जात असे. त्याचा सुगंध सर्वदूर पसरत असे. दिवसभर काम केल्यानंतर हे सूप पिऊन लोकांना आराम मिळत असे.

कालांतराने, मिनेस्ट्रोन सूप बनवण्याची साधी पद्धत मागे पडली. लोक इटलीहून जगाच्या इतर भागात स्थलांतरित होत असताना या सूपची रेसिपी देखील सोबत नेली. स्वाभाविकच वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये ते बनवण्याच्या पद्धतीत बदल झाले. प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक घटकांनुसार त्यात नवीन चवी जोडल्या गेल्या. त्यात अगदी स्थानिक मसालेदेखील वापरले गेले. या विविधतेमुळे मिनेस्ट्रोन आणखी लोकप्रिय झाले. आज हे सूप जगभरातील रेस्टॉरंट्समध्ये दिले जाते. आता हे फक्त गरिबांचे अन्न राहिलेले नाही, तर तो सर्व वर्गातील लोकांना आवडणारा एक पदार्थ बनला आहे.

## ताण येणार नाही

मुलांनो, तुम्हाला दिवसभरात बरंच काही करायचं असतं. शाळेत जायचं असतं, क्लास, छंदवर्ग, खेळणं, मित्रमैत्रिणींशी गप्पा, गृहपाठ, अवांतर वाचन... ही यादी न संपणारी आहे. आता या सगळ्याचं नियोजन करायचं तरी कसं, एका दिवसात एवढं सगळं कसं करता येणार अशा प्रश्न तुम्हाला पडत असेल. पण सगळ्या कामांची यादी केली तर बरंच काही सोपं होऊन जाईल. वेळेचं नियोजन किंवा व्यवस्थापन वाटतं तितकं कठीण नक्कीच नाही. तीन टप्प्यांमध्ये आपण कामाचं सगळं नियोजन करू शकतो.



**लाईफस्टाईल**

* सर्वात आधी कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. अभ्यास, खेळणं, मित्रमैत्रिणींसोबत गप्पा, चित्र काढणं, गाणी म्हणणं असं बरंच काही तुम्हाला करायचं असतं. आता यापैकी काय महत्त्वाचं आणि काय नंतर करता येईल हे ठरवा. महत्त्वाची कामं आधी करा. तुम्ही विद्यार्थी आहात. त्यामुळे अभ्यासाला महत्त्व द्यायला हवं.

* यानंतर कामाचं नीट नियोजन करा. पहिलं काम आधी करा, मग दुसरं काम अशाप्रकारे दिवसभराची कामं करत रहा. अशाप्रकारे आठवड्याचं नियोजन करा. तुमची कामं झटपट होऊ लागतील.

**स्टडी टिप्स**

### चला, अभ्यासाला लागू या



मुलांनो, शाळा सुरू झाल्या आहेत. तेव्हा आता अभ्यासाचा वेगही वाढवावा लागेल. सर्वप्रथम तुम्ही महत्त्वाच्या विषयांच्या तयारीला लागा. प्रत्येक विषयाचे महत्त्व जाणून घ्या. पाढे वाचा. विज्ञानातल्या आधी शिकलेल्या संज्ञा लिहून काढा. शिकलेल्या पाठातील महत्त्वाचे मुद्दे तुमच्या अभ्यासाच्या खोलीतल्या भिंतीवर चिकटवा. येता जाता हा तक्ता वाचत रहा. यामुळे ऐनवेळी तुमच्यावर अभ्यासाचा ताण येणार नाही.

**खादाडी**

### मस्त ब्रेड रोल



दोस्तांनो, नेहमीचं सँडविच खाऊन कंटाळा आला असेल तर सँडविच रोलही ट्राय करता येईल. यासाठी तीन ब्रेड, दोन चमचे बटर, एक गाजर, टोमॅटो सॉस एक चमचा, एक चमचा हिरवी चटणी, थोडं पाणी हे साहित्य घ्या. पहिल्यांदा ब्रेडच्या कडा कापून घ्या. आता ब्रेडच्या कडांना पाणी लावून घ्या आणि सगळे ब्रेड एकावर एक ठेऊन घ्या. ब्रेडवर थोडं थोडं पाणी लावून लाटून घ्या. आता ब्रेडच्या कडा जोडून घ्या. एका ब्रेडला टोमॅटो सॉस तर दुसऱ्या ब्रेडला चटणी लावा. आता गाजर किसून घ्या. त्यात लोणी मिसळून घ्या. तिसऱ्या ब्रेडवर गाजराचं हे मिश्रण लावा. आता सर्व ब्रेड रोलप्रमाणे गुंडाळून घ्या.

**दोस्त हे मस्त**

### अनोखं फ्रांसुआ माकड



ऑस्ट्रेलियातल्या प्राणीसंग्रहालयात दुर्मीळ प्रजातीच्या माकडाचा जन्म झाला होता. केशरी रंगाच्या या माकडाला फ्रांसुआ माकड असं म्हणतात. या प्रजातीची माकडं चीन आणि व्हिएतनाममधल्या जंगलांमध्ये आढळतात. या माकडांची पिल्लं केशरी रंगाची असतात पण प्रौढ झाल्यावर ती काळपट दिसू लागतात. ही प्रजाती दुर्मीळ म्हणून गणली जाते. या माकडांची मोठ्या प्रमाणावर शिकार झाल्याने संख्या खूप कमी झाली आहे. त्यामुळे त्यांचं रक्षण करणं गरजेचं आहे.

**योगा टाईम**

### लाभ सिंगासनाचे



सिंगासनामुळे चेहऱ्यावर चमक येते. त्वचेचं आरोग्य सुधारतं. हे आसन करण्यासाठी तुम्हाला वज्रासनात बसावं लागेल. गुडघे थोडे बाहेरच्या बाजूला न्यावे लागतील. आता दोन्ही हातांची बोटं सिंहाच्या पंजाप्रमाणे करून गुडघ्यांवर ठेवा. यानंतर श्वास घेऊन जीभ बाहेर काढा आणि सिंहाप्रमाणे आवाज काढा. गळ्याच्या स्नायूंवर ताण आला पाहिजे. हे आसन नियमित केल्याने तुमच्या त्वचेवर छान चमक येईल.




**‘शोले’ या ऐतिहासिक चित्रपटातील ठाकूर बलदेवसिंह ही भूमिका ज्यांनी हिंदी चित्रपटात अजरामर केली ते संजीवकुमार. संजीवकुमार यांची एक स्वत:ची शैली होती.**

# एक शापित अभिनेता संजीव कुमार



**श्रीराम शेटये**

दिलिप कुमार यांची नकल करत अभिनेते बनलेले धर्मेंद्र, अमिताभ, राजेंद्र कुमार, मनोज कुमार, जॉय मुखर्जी यासारखे सगळेच अभिनेते दिलिप कुमार यांना आपले गुरू मानतात. दिलिप कुमार यांच्या पावलावर पाऊल ठेऊन अभिनय करणारे बहुतेक सगळेच जण आहेत. परंतू या सगळ्या अभिनयाला छेद देत आपली वेगळी शैली साकार करणारे अभिनेते म्हणजेच ‘संजीवकुमार’. संजीवकुमार एखाद्या भूमिकेत शिरले की ते पात्र जीवंत होत असे. दातात जीभ दाबून बोलण्याची त्यांची अनोखी लकब भाव खाऊन जायची. प्रचंड आक्रमक होऊन रागाने थरथरत डोळे विस्फारून केलेला अभिनय राग, दु:ख, वेदना इत्यादी भावना अचूक आणि प्रभाविपणे साकार करताना संजीवकुमार जीव ओतून अभिनय करायचे. ‘शोले’ ‘खिलौना ’ मधला अभिनय आठवला की हे सहज लक्षात येते.

हिंदी चित्रसृष्टीतील सशक्त, प्रतिभासंपन्न आणि सृजनशील अभिनेता म्हणून संजीवकुमार यांना ओळखले जाते. चित्रपटसृष्टीतील पारंपारिक नायकांच्या चौकटीला छेद देत आपली स्वत:ची शैली प्रस्थापित करणारे संजीवकुमार त्यांचा संघर्ष, त्यांचे यश, त्यांचे प्रेमजीवन, त्यांचा प्रेमभंग ते त्यांचा अकाली अंत एक विलक्षण जीवन जगलेला कलावंत म्हणूनही ओळखले जातात. २५ वर्षांच्या चित्रपट कारकीर्दीत त्यांनी १५० पेक्षाही जास्त चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. ‘दस्तक’ आणि ‘कोशिश’ या चित्रपटांनी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. याशिवाय सर्वश्रेष्ठ अभिनेता म्हणूनही तीन फिल्मफेअर पुरस्कारांनीही संजीव कुमार यांना सन्मानित करण्यात आले.

गुजरातमधील सुरत येथे जन्म ९ जुलै १९३८ ला एका मोठ्या, निम्न-मध्यमवर्गीय गुजराती कुटुंबात ‘हरिहर जेठालाल जरीवाला’ यांचा जन्म झाला. वडिलांचे नाव जेठालाल जरीवाला आणि आईचे नाव शांताबेन जरीवाला तर त्यांना किशोर जरीवाला आणि नकुल जरीवाला हे दोन धाकटे भाऊ आणि लीला जरीवाला ही एक बहीण होती. लीला जरीवाला यांनीही अभिनय क्षेत्रात नशीब आजमावले होते.

हरिहरला शालेय जीवनापासून अभिनयाची आवड होती. मुंबईतील इंडियन नॅशनल थिएटरमध्ये अभिनय करण्यासाठी त्याने शाळा सोडली. त्यानंतर फिल्मालय ॲक्टिंग स्कूलमध्ये प्रवेश घेतला. इथे पी.डी.शेनॉय यांच्या मार्गदर्शनाखाली अभिनयाचे प्रशिक्षण घेतले. इंडियन नॅशनल थिएटरच्या काळात, चित्रपट निर्माते सावन कुमार टाक यांनी त्याला संजीव कुमार हे पडद्यावरील नाव दिले.१९६० साली आलेल्या ‘हम हिंदुस्तानी’या चित्रपटात केवळ दोन मिनिटांच्या भूमिकेतून आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात केली. हा काळ त्यांच्या संघर्षाचा काळ होता. अनेकदा अन्नाविना रहावे लागले. प्रवासासाठी पैसेही नव्हते आणि अंगावर चांगले कपडेही नव्हते पण अभिनयासाठी त्यांचा संघर्ष सुरु होता. अखेर प्रयत्नांना यश आले. नायक म्हणून अस्पी इराणी दिग्दर्शित ‘निशान’ (१९६५) या लो बजेट चित्रपटातून त्यांचा पहिला चित्रपट मिळाला. त्यानंतर त्यांनी आणखी काही बी-ग्रेड चित्रपट केले. या काळात त्यांचा सर्वात लोकप्रिय चित्रपट ‘राजा और रंक’ (१९६८) होता, हा चित्रपट विशेषतः त्याच्या संगीतामुळे गाजला.

चित्रपटसृष्टीत स्टारडम ही संकल्पना त्याकाळात नुकतीच रुजू झालेली होती. राजेश खन्ना हा बॉलीवूडचा पहिला सुपरस्टार समोर आला. तर‘एंग्री यंग मॅन’च्या रूपात अमिताभ बच्चनने सामान्य माणसांच्या समस्या आणि संघर्षाला वाचा फोडली. आणि त्यांच्याही आधी देव आनंद या पहिल्या स्टाइल गुरुचा बॉलीवूडमध्ये समावेश झाला होता. अशा चित्रपटसृष्टीच्या कात टाकण्याच्या काळात संजीव कुमार या सर्वांपेक्षा वेगळे ठरत, शांतपणे आपल्या मार्गाने जात आपल्या एका वेगळ्या स्थानी जाऊन पोचले.

व्यावसायिक आणि ‘ऑफ बीट’ चित्रपटातील भेद मिटवून आपला वेगळा प्रेक्षक बनवित आपले स्थान पक्के करत होते. अभिनयाच्या बळावर त्यांनी आपला एक वेगळा चाहता वर्ग निर्माण केला जो नेहमीच त्यांच्या वेगळ्या भूमिकांतील चित्रपटाची प्रतीक्षा करणारा होता.

१९७० मध्ये, मुमताज यांच्यासोबतच्या ‘खिलोना’ मध्ये, त्यांनी वेड्या माणसाची भूमिका साकारली होती. या चित्रपटाने त्यांना एक सशक्त अभिनेता म्हणून चित्रपटसृष्टीत मान्यता मिळाली. या चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. त्याच वर्षी, त्याच वर्षी राजिंदर सिंग बेदी यांच्या ‘दस्तक’या चित्रपटातील अभिनयासाठी त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. अर्थात ‘दस्तक’ सारखा चित्रपट केवळ संजीव कुमार यांच्यासाठीच लिहिला गेला असावा. मंटो, कृष्ण चंदर आणि राजेंद्र सिंग बेदी हे त्या काळातील उर्दू लेखकांचे त्रिकूट होते. बेदी यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘दस्तक’ या चित्रपटात एक सज्जन गरजू जोडपे मुंबईत भाड्याच्या निवासस्थानाचा शोध घेत असता. दलाल त्यांना रेड लाईट एरियामध्ये भाड्याचे घर मिळवून देतो. अर्थातच त्याच एरियातले घर समजून ग्राहक केव्हाही या घराच्या दरवाज्यावर दस्तक देत असत. या प्रतिकुल वातावरणात राहण्याचा जोडप्याचा संघर्ष मांडणारी एक आश्चर्यकारक कथा यात साकारण्यात आली होती. साहित्य, चित्रपट आणि अभिनय यांच्या या संयोगाने एका रात्रीत संजीवकुमार यांची अभिनेता म्हणून प्रतिष्ठा वाढली. याच चित्रपटातून पदार्पण करणाऱ्या रेहाना सुलतान यांना त्यांच्या पदार्पणात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता.

१९७१ मध्ये त्यांनी तनुजा यांच्यासोबत बासू भट्टाचार्य यांच्या ‘अनुभव’ या चित्रपटात अभिनय केला. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. १९७२ मध्ये, गुलजार यांनी ‘परिचय’ या चित्रपटात जया भादुडीच्या वडिलांची भूमिका साकारण्यासाठी बोलावले. खरं तर ही भूमिका निवडणे त्याकाळात नायकाची भूमिका करणाऱ्या संजीवकुमार यांच्यासाठी धाडसी निर्णय होता. पण त्यांनी तो स्वीकारला. त्याच वर्षी, गुलजार यांनी कर्णबधिर आणि मूक जोडप्याच्या संघर्षावर आधारित असलेल्या ‘कोशीश’ या चित्रपटात जया भादुडीसोबत नायकाची भूमिकाही त्यांनाच दिली. ‘कोशिश’ चित्रपटापासून त्यांची गुलजार यांच्याशी जोडी जमली. या जोडीने अनेक चांगले चित्रपट दिले. ‘कोशिश’ मध्ये त्यांनी साकारलेल्या मूक-बधिर व्यक्तीच्या भूमिकेला राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच काळातील त्यांच्या सीता और गीता (१९७२), मनचली (१९७३), अनहोनी (१९७३), अनामिका (१९७३), आप की कसम (१९७४), मनोरंजन (१९७४), शानदार (१९७४), नया दिन नई रात (१९७४), चरित्रहीन (१९७४), फरार (१९७५) या चित्रपटांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. यातील नया दिन नई रात या चित्रपटात पहिल्यांदा एक नवा प्रयोग करण्यात आला. संजीव कुमार यांनी एकाच चित्रपटात नऊ रसांची अभिव्यक्ती करणाऱ्या ९ भूमिका साकारल्या होत्या. १९७५ ला हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्व विक्रम मोडणारा रमेश सिप्पी यांचा ‘शोले’ (१९७५) हा चित्रपट आला. यात संजीवकुमार यांनी ‘ठाकूर बलदेव सिंग’ ही दोन्ही हातांनी अपंग झालेल्या पण तरीही आपल्या गावाला त्रास देणाऱ्या डाकू गब्बरसिंगविरोधात उभे राहणाऱ्या सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. ही भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील संस्मरणीय भूमिका म्हणून गाजली. त्याच वर्षी त्यांनी सुचित्रा सेन यांच्यासोबत गुलजार यांच्या ‘आंधी’ आणि शर्मिला टागोर यांच्यासोबत ‘मौसम’ मध्ये अभिनय साकारला. ‘आंधी’ मध्ये त्यांनी पुन्हा सुचित्रा सेन यांच्यासोबत एका वृद्ध व्यक्तीची भूमिका साकारली. हा चित्रपट एका राजकारणी महिलेच्या जीवनाचे संवेदनशील चित्रण करणारा होता. राजकीय महत्वाकांक्षेमुळे पतीपासून विभक्त झालेल्या पत्नीची अचानक पतीशी भेट होते. त्यांच्यातील प्रेम पुन्हा जागृत होते असे कथानक असलेल्या या चित्रपटातील पतीच्या भूमिकेसाठी संजीव कुमार यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा आणखी एक फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. त्यांच्या कारकिर्दीतील उल्लेखनीय म्हटली जाणारी भूमिका मौसम या चित्रपटात होती. आपल्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीला सोडून गेलेला नायक, त्यामुळे वेडी होवून तिचा झालेला दुर्दैवी अंत. लग्नाआधी झालेली मुलगी वेश्या झालेली कळल्यामुळे अपराधबोधाने ग्रस्त झालेल्या नायकाची हृदय पिळवटून टाकणारी कथा या चित्रपटात साकारण्यात आली आहे. या चित्रपटातील नायकाच्या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते. त्यानंतर त्यांनी रवी टंडन यांच्या ‘जिंदगी’ (१९७६), हृषिकेश मुखर्जी यांच्या ‘अर्जुन पंडित’ (१९७६), सत्यजित रे यांच्या ‘शतरंज के खिलाडी’ (१९७७), ‘यही है जिंदगी’ (१९७७), त्रिशूल (१९७८) आणि ‘पति पत्नी और वो’(१९७८) या चित्रपटांमध्ये अभिनय साकारला. संजीवकुमार यांच्या कारकिर्दीतील दोन महत्वाचे चित्रपट म्हणजे गुलजार यांचे ‘अंगूर’ (१९८२) आणि ‘नमकीन’ (१९८२). दोन्ही चित्रपट आता कल्ट क्लासिक चित्रपट मानले जातात. ‘अंगूर’ मधील त्यांची दुहेरी भूमिका भारतीय चित्रपटसृष्टीतील २५ सर्वोत्कृष्ट अभिनयांमध्ये गणली जाते. १९८२ मध्ये शक्ती सामंता निर्मिती दिग्दर्शित अय्याश या चित्रपटात संजीवकुमार आणि रति अग्निहोत्री प्रमुख भूमिकेत होते. बिमल मित्रा यांच्या बंगाली कादंबरीवर आधारित हा चित्रपट १९७२ च्या स्त्री या बंगाली चित्रपटाचा रिमेक आहे. आनंद बक्षी यांची गीते तर रविंद्र जैन यांचे संगीत असलेल्या या चित्रपटातील येशूदास व आशा भोसले यांनी गायलेली गाणी गाजली होती.

पडद्यावर आपली प्रत्येक भूमिका शब्दश: जगणाऱ्या या कलाकाराचे व्यक्तीगत आयुष्य मात्र दु:खद होते. ते आयुष्यभर अविवाहित राहिले. तसेच त्यांनी १९७३ मध्ये अभिनेत्री हेमामालिनी यांना लग्नाचा प्रस्ताव दिला होता पण त्यावेळेस हेमामालिनी धर्मेंद्र यांच्या प्रेमात असल्याने, त्यांनी नकार दिला. हेमामालिनीने लग्नाचा प्रस्ताव नाकारल्याने संजीवकुमार नंतर एकाकीच राहिले. सुलक्षणा पंडित यांनी उघडपणे आपले प्रेम व्यक्त करत लग्नाचा प्रस्तावही संजीवकुमार यांच्यासमोर ठेवला. पण आपण ५० वर्षांपेक्षा जास्त जगूच शकणार नाही या गोष्टीची त्यांना पूर्ण खात्री होती. सुलक्षणा पंडीत यांना नकार पचवन खूप जड गेल होत. जवळ जवळ सुलक्षणा पंडीत डीप्रेशन मध्ये गेली होती. नकार देण्याचे कारण त्यांच्या अनेक पिढ्यांमध्ये कुणीही पुरुष ५० वर्षांपेक्षा जास्त जगू शकला नव्हता. म्हणून त्यांनी तो प्रस्ताव आदरपूर्वक नाकारला. कारण त्यांच्या कुटुंबात मोठा मुलगा १० वर्षांचा झाल्यावर कुटुंबातील वडिलांचा मृत्यू होतो अशी त्यांची अंधश्रद्धा होती. हे त्यांचे आजोबा, वडील आणि छोटा भाऊ नकुल यांच्याबाबतीत घडलेले असल्याने त्यांचा हा विश्वास अधिक दृढ होता. संजीवकुमार यांनी आपल्या दिवंगत भावाच्या मुलाला दत्तक घेतले. हा मुलगा दहा वर्षांचा झाल्यावर संजीवकुमार यांना पहिला हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्यावर अमेरिकेत बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली. तरीही ६ नोव्हेंबर १९८५ रोजी वयाच्या ४७ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांनी या दुनियेला अलविदा म्हटले. ●●

## ‘वॉर २’ चे चित्रीकरण पूर्ण



हृतिक रोशन म्हणजे उत्कृष्ट नृत्य आणि प्रभावी ॲक्शन दृश्य... ही वैशिष्ट्ये असल्यामुळे हा देखणा अभिनेता आजही तरुणींच्या गळ्यातील ताईत आहे. सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्ट्सची जोरदार चर्चा असून ‘वॉर २’ बाबतची मोठी अपडेट अशी की, १४९ दिवसांच्या व्यस्त शेड्यूलनंतर हृतिक रोशनने आता त्याचे शूटिंग पूर्ण केले आहे. चित्रपटामध्ये त्याच्यासोबत ज्युनियर एनटीआर देखील मुख्य भूमिकेत असून ॲक्शन सीक्वेन्स, दोन गाणी आणि अनेक नाट्यमय क्षण १४९ दिवसांच्या शूटिंगमध्ये शूट करण्यात आले आहेत.

थोडक्यात आता ‘वॉर २’ प्रमोशनच्या शेवटच्या टप्प्यात आहे. चित्रपटाची दोन उत्तम गाणी लवकरच प्रदर्शित होऊ शकतात. त्यानंतर ट्रेलर लॉंच केला जाईल. सध्या संपूर्ण टीम ट्रेलर आणि गाण्यांच्या रिलीजची तयारी करत आहे. अयान मुखर्जी पुढील २० दिवसांमध्ये व्हीएफएक्स आणि बॅकग्राउंड स्कोअरसह ‘वॉर २’ चा अंतिम भाग लॉक करणार आहे.

चित्रीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर नुकतेच हृतिक रोशनने अयान मुखर्जी आणि ज्युनियर एनटीआर यांना कुटुंबियांसह आणि यशराज फिल्म्सच्या संपूर्ण टीमसह रात्रीच्या जेवणासाठी आमंत्रित केले होते. तेव्हा ही टीम यशाचे सेलिब्रेशनही अशाच धडाक्यात करेल, अशी आशा बाळगू या.

## तुलसीचे पुनरागमन



२००० मध्ये सुरू झालेला ‘क्युंकी सास भी कभी बहू थी’ हा टीव्हीवरील आजपर्यंतचा सर्वात हिट शो म्हणून ओळखला जातो. २५ वर्षांनंतरही या शो चे आणि त्यातील पात्रांचे आकर्षण कमी झालेले नाही. आता अडीच दशकांनंतर ‘क्युंकी सास भी कभी बहू थी’ पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर परतत असून त्यातील तुलसी म्हणजेच स्मृती इराणीची पहिली झलकही समोर आली आहे.

काही दिवसांपूर्वी एकता कपूरने हा शो पुन्हा येत असल्याची घोषणा केली होती. त्यानुसार शो चे शूटिंगही सुरू झाले आणि आता सोशल मीडियावर सेटवरील पहिली झलकही व्हायरल झाली.

स्मृती इराणी ‘क्युंकी सास भी कभी बहू थी २’ मध्ये तुलसीच्या भूमिकेत पुनरागमन करत आहे. एकीकडे शूटिंग जोरात सुरू आहे तर दुसरीकडे सोशल मीडियावर तुलसीचा एक फोटोही व्हायरल होत आहे. फोटोमध्ये स्मृती इराणी तुलसीच्या गेटअपमध्ये दिसत असून तिने सोनेरी बॉर्डरची मरून रंगाची स्ट्रेट पल्लू साडी परिधान केली आहे. जुन्या शो प्रमाणे स्मृती इराणीने मंगळसूत्र, नेकलेस, मोठी लाल बिंदी आणि सिंदूर असा सगळा शृंगार केला असून तिची साइड पार्टेड हेअरस्टाइल नजरेत भरणारी आहे. बॅकग्राउंडमध्ये शो चा सेट दिसत आहे. स्मृती इराणीचा हा फोटो पाहून चाहत्यांमध्ये उत्साह वाढला असल्याचे वेगळे सांगायला नको. तथापि, हा फोटो निर्मात्यांनी किंवा स्मृतीने शेअर केलेला नाही, हेदेखील लक्षात घ्यावे लागेल.

स्मृती इराणीने अलीकडेच करण जोहर आणि बरखा दत्त यांच्याशी झालेल्या संभाषणात खुलासा केला होता की, २०१४ मध्येच ‘क्यूंकी सास भी कभी बहू थी’ शो पुन्हा करण्याचा करार समोर आला होता. परंतु तो स्विकारला नाही कारण मला भारतीय संसदेत कॅबिनेट मंत्री म्हणून काम करायचे होते... आता या मालिकेच्या माध्यमातून स्मृतीची दुसरी इनिंग कशी सुरू होते, हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## येतोय ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’



‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ चा टीझर प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला असून येत्या दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या हा चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढली आहे. अभिनेता सिद्धार्थ बोडकेची चित्रपटात मुख्य भूमिका असेल. अलिकडेच म्हणजे आषाढी एकादशीच्या निमित्ताने चित्रपटाच्या प्रदर्शनाची घोषणा करण्यात आली. त्याचे लेखन आणि दिग्दर्शन महेश वामन मांजरेकर यांनी केले असून निर्मितीची धुरा राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी सांभाळली आहे. टीझरमध्ये बालकलाकार त्रिशा ठोसर लक्ष वेधून घेत आहे.

टीझरमध्ये ऐकू येणारे ‘राजं राजं’ हे बोल ऊर्जेने आणि भावनांनी भरलेले असल्यामुळे थेट काळजाला भिडणारे आहे. शिवरायांच्या झंझावाती व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यागमय नेतृत्वाने दर्शन घडवणाऱ्या टीझरमधील दृश्ये आणि संवाद अंगावर शहारे आणणारे आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून केवळ इतिहासाचे पुनरावलोकन न करता आधुनिक काळातील समाजाला भिडणारा विचारप्रवाह पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे समोर येत आहे. दिग्दर्शक महेश मांजरेकर याविषयी बोलताना म्हणाले, शिवाजी महाराज ही केवळ ऐतिहासिक व्यक्तिरेखा नसून ते एक विचार आहेत. आजच्या काळात हा विचारच सर्वाधिक महत्त्वाचा आहे. ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ म्हणजे इतिहासाकडे मागे वळून पहाणे नाही तर शिवरायांच्या विचारांच्या प्रकाशात आजचा अंधार उजळवण्याचा एक प्रयत्न आहे. समाजात निर्माण झालेली निराशा, उदासीनता, आणि दिशाहीनतेच्या गर्तेत आपण पुन्हा एकदा शिवाजी महाराजांच्या मूल्यांकडे वळणे गरजेचे आहे. हा सिनेमा त्या जाणिवेचा आवाज आहे. म्हणजेच ‘पुन्हा शिवाजीराजे भोसले’ भूतकाळात रमणारा नाही तर आजच्या समाजाला जागे करणारा ठरणार आहे. शिवाजी महाराजांचे विचार आणि तत्वे आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा एक सशक्त प्रयत्नच म्हणावा लागेल.

## मोठी मजल गाठली

‘सितारे जमीन पर’ पासून ‘मां’ आणि ‘मेट्रो’ पर्यंत जून आणि जुलै महिन्यात सलग चित्रपट प्रदर्शित झाले. जून महिन्याची सुरुवात ‘हाऊसफुल ५’ ने झाली आणि त्याने भारतीय तसेच जगभरातील बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. चित्रपटाने २० दिवसातच देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर करोडोंची कमाई केली.



सलग दोन चित्रपट प्रदर्शित झाल्यामुळे अक्षयची किलर कॉमेडी लवकरच संपेल, असे वाटले होते. तथापि, चित्रपट ३२ व्या दिवशीही बॉक्स ऑफिसवर मजबूत राहिला आणि चांगली कमाई केली. इतकेच नाही तर त्याने जगभरातील बॉक्स ऑफिसवर राज्य करुन एक मोठा विक्रमही रचला आहे.

‘हाऊसफुल-५’ ब्लॉकबस्टर ठरला नसला तरी बजेट वसूल करण्यात आणि जगभरातून नफा कमावण्यात यशस्वी झाला आहे. रिलीजच्या ३२ व्या दिवशी त्याने सुमारे पाच लाखांची कमाई करणे महत्त्वाचे म्हणावे लागेल. आतापर्यंत त्याने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १८३.२७ कोटींची कमाई केली आहे.

विकी कौशल आणि रश्मिका मंदाना यांचा ‘छावा’ ने जगभरात ७०० कोटींहून अधिक कमाई केली होती. ‘हाऊसफुल ५’ हा विक्रम मोडू शकला नाही, परंतु तो या वर्षीचा सर्वाधिक कमाई करणारा बॉलिवूड चित्रपट बनला आहे, यातही शंका नाही. त्याचे ३०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणे थोडे कठीण आहे, परंतु बॉक्स ऑफिसवर सुरू आहे तोपर्यंत कोणत्याही क्षणी स्थिती पलटू शकते.

## ‘खतरों के खिलाडी’ विषयी...

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय रिॲलिटी शो बाबत बोलताना रोहित शेट्टीच्या ‘खतरों के खिलाडी’ चा उल्लेख केल्याखेरीज पुढे जाता येणार नाही. बऱ्याच काळापासून त्याने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. अशातच गेल्या काही दिवसांपासून ‘खतरों के खिलाडी सीझन १५’ बद्दल चर्चा रंगत आहे. त्याच्या प्रीमियरबद्दल नवनवीन अपडेट येत असल्यामुळे लवकरच चाहत्यांना आनंदाची बातमी मिळू शकते. ‘सीझन १४’ संपल्यापासून प्रेक्षक त्याच्या पुढील सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. तेव्हा आनंदाची बाब म्हणजे हा रिॲलिटी शो पुढील वर्षी जानेवारी २०२६ पासून सुरू होऊ शकतो, असे समजत आहे. अर्थात त्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

सलमान खानचा ‘बिग बॉस’ संपल्यानंतर तो कलर्स टीव्हीवर प्रसारित झाल्याचे अनेकदा दिसून आले आहे. पण दरम्यान अशा बातम्या देखील आल्या की आता



‘बिग बॉस’ कलर्स टीव्हीवर येणार नाही. अशा परिस्थितीत, ‘खतरों के खिलाडी’ कलर्ससोबत आपला प्रवास सुरू ठेवेल की नाही हे पाहणे रंजक असेल. तथापि, शो शी संबंधित या ताज्या अपडेटमुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. नेहमीप्रमाणे, यावेळीही ‘खतरों के खिलाडी सीझन १५’ मध्ये मनोरंजन विश्वातील अनेक सेलिब्रिटीज स्पर्धक म्हणून दिसू शकतात. नवीन सीझनच्या अप्रोच रेसमध्ये समाविष्ट असणाऱ्या सेलिब्रिटीजच्या नावांच्या यादीमध्ये कृषल आहुजा, दिग्विजय राठी, अविनाश मिश्रा, ईशा सिंग अशी काही नावे आहेत. त्याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)